अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्ट्यूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी छोले भटूरे
Sambar PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १५.०७.२०२५ | अंक नं. ९१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डद्वारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर + 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*

# नगरच्या भूमिअभिलेख कार्यालयातील अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ अधिकाऱ्यांना घातला घेराव

नगर – नगरच्या भूमी अभिलेख कार्यालयात सुरु असलेल्या अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ शिवसेनेच्या वतीने अधिकाऱ्यांना घेराव घालत जाब विचारण्यात आला. माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले, पंचायत समिती माजी सभापती रामदास भोर यांच्यासह शेतकऱ्यांनी १५ जुलै रोजी दुपारी हे आंदोलन केले.

भूमि अभिलेख कार्यालयातून शेतकऱ्यांची अडवणूक केली जात आहे, अडचणी सोडवल्या जात नाहीत, याबाबत आठ दिवसांपूर्वी निवेदन दिले होते. या निवेदनाच्या आधारे तालुक्यातील शेतकरी भूमि अभिलेख कार्यालयात जमा झाले.

शेतीसंदर्भात अडचणी वेळेवर सोडवल्या जात नाही, शेतकऱ्यांना चकरा मारायला लावतात, तसेच जो पैसे देईल त्याचे काम करतात, याबाबत



भूमी अभिलेख कार्यालयातील अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ शिवसेनेच्यावतीने अधिकाऱ्यांना घेराव घालत जाब विचारताना संदेश कार्ले, रामदास भोर व शेतकरी.

संदेश कार्ले यांनी भूमि अभिलेखच्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. यावेळी शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेतल्या व येत्या पंधरा दिवसाच्या आत सर्व अडचणी सोडवल्या जातील, सर्वांची मोजणी केली जाईल, असे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले.

यावेळी २७ शेतकऱ्यांच्या नोंदी संदर्भात चर्चा झाली. त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यात आले व पंधरा दिवसाच्या आत शेतकऱ्यांच्या शेतीविषयक मोजणीच्या अडचणी दूर करणार असल्याचे यावेळी भूमी लेख अभिलेख कार्यालयाचे अधिकारी प्रवीण गायकवाड, दिलीप भिंगारदिवे यांनी सांगितले. यावेळी विठ्ठल हंडोरे, रोहिदास उदमले, रखमाजी बेरड, राजाराम रासकर, उत्तम गायकवाड, बाजीराव लबडे, दशरथ जाधव आदी उपस्थित होते.

नमस्कार, आमच्या असंख्य ग्राहकांनी एक्सचेंज ऑफरला उस्फुर्त प्रतिसाद दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार, सध्या चालू असलेली एक्सचेंज ऑफर ही दिनांक २७ जुलै २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. तरी नगरकरांनी या ऑफरचा लाभ घ्यावा.
MEGA EXCHANGE OFFER
जुने घेऊन या..! नवीन घेऊन जा..!
Any Thing...For Any Thing...
* क्रॉकरी * डिनरसेट * ग्लासेस कॉपर आयटम्स् * टॉईज
* आर्टीफॅक्टस * टॉवेल * बेडशीटस् * ब्रॅण्डेड घड्याळ
Franchise by DB VENTURES One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Opp. Gold's Gym Plot No. 1 Survey NO. 130, TV Centre, Savedi Road, Ahilyanagar.
Mob.: 7887395983
ॲडिशनल ऑफरसह
Monday Closed
T & C Apply*

कमी ऐकू येते का ?
signia Life sounds brilliant.
कंपनीचे अधिकृत विक्रेते
• न दिसणारे डिजीटल श्रवण यंत्र
• ३१ वर्षापासून सेवेत
• इंग्लंडमधील अनुभव असलेले ऑडिओलॉजिस्ट
• लहान मुलांच्या तपासण्या
• स्पीच थेरपी
15% Discount
स्थापना : १९९२ साई हिअरिंग क्लिनिक
साई सर्जिकल ॲण्ड हिअरिंग सर्व्हिसेस
कोहिनूर प्लाझा (बेसमेंट), पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अ.नगर.
मो. 83800 41240
वेळ : सकाळी १० ते सायं. ७ (रविवार बंद)



कोठला बस स्थानक परिसरात महामार्गालगत प्लॅस्टीकच्या गोण्यांमध्ये टाकण्यात आलेले ॲनिमल वेस्ट छायाचित्रात दिसत आहे.

# रस्त्याच्या कडेला आणि नाल्यातही सर्रास टाकले जातेयं ॲनिमल वेस्ट

## कत्तलखान्यातील ॲनिमल वेस्टच्या दुर्गंधीने नागरिक हैराण

नगर – नगर शहरात पोलिस यंत्रणेने अनेकदा कारवाया करूनही कत्तलखाने सुरु असून या कत्तलखान्यातील ॲनिमल वेस्ट महामार्गाच्या कडेला, तसेच नाल्यात टाकले जात असून त्याच्या दुर्गंधीमुळे नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. हे ॲनिमल वेस्ट टाकणाऱ्यांवर कारवाई करण्यात महापालिका प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात असल्याने गेल्या अनेक दिवसांपासून हा प्रश्न कायम आहे.

शहरातून जाणाऱ्या छत्रपती संभाजीनगर महामार्गालगत कोठला बसस्थानक परिसरात दररोज मोठ्या प्रमाणावर हे ॲनिमल वेस्ट टाकण्यात येत आहे. त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरत आहे. या परिसरातून जाताना नाक दाबूनच जावे लागत आहे. याच परिसरातून छत्रपती संभाजीनगर व मनमाड महामार्गाकडे जावे लागते, या ठिकाणी वाहनांची मोठी वर्दळ असते. शहरातील स्थानिक नागरिकांबरोबरच बाहेरगावहून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनचालक तसेच प्रवाशांना या दुर्गंधीचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने नगर शहराचीही मोठी बदनामी होत आहे.

याशिवाय जुन्या आरटीओ कार्यालयाजवळील नाल्यातही मोठ्या प्रमाणात ॲनिमल वेस्ट टाकले जात असल्याने परिसरातील रहिवासी तसेच या भागात असलेल्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनी, शिक्षक यांना या दुर्गंधीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. परिसरातील नागरिकांनी महापालिकेकडे अनेकदा तक्रारी करूनही ही समस्या सुटलेली नाही.

काही दिवसांपूर्वी महापालिकेच्या घनकचरा विभागाने अशा प्रकारे ॲनिमल वेस्ट टाकणाऱ्यांवर कारवाईची मोहीम सुरु केली होती. मात्र ती मध्येच बंद पडली आहे. त्यामुळे नागरिकांची या ॲनिमल वेस्ट च्या दुर्गंधीच्या त्रासापासून सुटका करण्यासाठी महापालिका प्रशासन व पोलिसांनी संयुक्त कारवाईची मोहीम सुरु करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### ॲनिमल वेस्टमुळे वाढला मोकाट कुत्र्यांचा उपद्रव

कत्तलखान्यातील ॲनिमल वेस्ट, हॉटेलमधील नॉनव्हेज वेस्ट गोण्यांमध्ये भरून सर्रास रस्त्याच्या कडेला तसेच नाल्यांमध्ये फेकून दिले जात आहे. त्यामुळे मोकाट कुत्र्यांना हे खाद्य सहज उपलब्ध होते. या खाण्यामुळे कुत्रे अधिक हिंस्र होऊन नागरिकांवर हल्ले करत आहेत. त्यामुळे अगोदरच दुर्गंधीमुळे हैराण झालेल्या नागरिकांना मोकाट कुत्र्यांचा उपद्रवही वाढला आहे.

Ruby Hall Clinic
मोफत तपासणी शिबीर
पुण्यातील सुप्रसिद्ध डॉक्टर तुमच्या भेटीला आता अहमदनगरमध्ये
डॉ. केदार पाटील
कन्सल्टंट बॅरिएट्रिक आणि लॅपरोस्कोपिक सर्जन
बुधवार, दिनांक: १६ जुलै २०२५ दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत
विशेष प्राविण्य
• बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया
• लॅपरोस्कोपिक आणि जटिल हर्निया शस्त्रक्रिया
• वजन कमी करण्यासाठी शस्त्रक्रियेव्यतिरिक्त उपचार पद्धती
• प्रगत लॅपरोस्कोपिक शस्त्रक्रिया
• पोटाचे विकार व कर्करोग
ठिकाण: साई प्रशिक्षण हॉस्पिटल, विराज इस्टेट, तारकपूर बस स्टॉप समोर तारकपूर, अहमदनगर ४१४००१
नाव नोंदणी करिता संपर्क : ९९२१००८९१९
सर्वप्रथम येणाऱ्यास नाव नोंदणीसाठी प्राधान्य

१२ वे पुण्यस्मरण



स्व.पै. सहादूजी अनाजी गुंजाळ (तात्या)
स्व.दि.१६/०७/२०१३ (आखाडा वस्ताद)
सुसंस्कार ... सुविचारांचा वारसा आमच्या पाठीशी आहे...
स्मृती सुगंध आपल्या आदर्शत्वाचा आजही दरवळत आहे...
आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली !
* दुःखांकित *
चंद्रकांत माणिकराव खेत्रे (कांताशेठ)
(कांदा, बटाटा, भाजीपाला, आडते कमिशन एजंट मार्केटयार्ड, अ.नगर)
(गाळा नं.२, गेट नं.२, मार्केटयार्ड, गाळा नं.२३१, नेप्ती कांदा मार्केट, अ.नगर)
बाळासाहेब माणिकराव खेत्रे । अमोल चंद्रकांत खेत्रे
महेश चंद्रकांत खेत्रे । पद्माकर कोंडिराम खेत्रे
सागर अरुण खेत्रे । युवराज अरुण खेत्रे
समस्त खेत्रे परिवार, अहिल्यानगर

ABHAY SALES CORPORATION & HARDWARE
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
बाथरूमची शोभा वाढविणारे वन पीस कमोड
• ग्रॅव्हिटी • जग्वार • जॉन्सन
तेही नवीन व्हरायटी उपलब्ध...

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# मालमत्ता सर्वेक्षणासाठी खाजगी संस्थेच्या कर्मचाऱ्यांकडून पैशांची मागणी; ठेका रद्द करावा अन्यथा 'काम बंद' पाडणार

### शिवसेनेचे महापालिका आयुक्तांना निवेदन

नगर - महापालिकेच्या वतीने शहर व उपनगरातील सर्व मालमत्तेचे सर्वेक्षण करण्यासाठी नियुक्त केलेल्या खाजगी संस्थेचे कर्मचारी नागरिकांकडून पैशांची मागणी करत असल्याचा आरोप करत सदर संस्थेचा ठेका तातडीने रद्द करावा अन्यथा सर्वेक्षण सुरु असलेले काम बंद पाडण्यात येईल असा इशारा शिवसेनेच्या वतीने देण्यात आला आहे.

याबाबत शिवसेनेच्या वतीने मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देऊन त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहरप्रमुख सचिन जाधव, माजी शहरप्रमुख संभाजी कदम, संजय शेडगे, बाळासाहेब बोराटे, दत्ता कावरे, शाम नळकांडे, संतोष गेनप्पा, सचिन शिंदे, संग्राम शेळके, पोपट पाथरे उपस्थित होते

निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर मनपाच्या वतीने शहर व उपनगर परिसरातील मालमत्ता धारकाचे नव्याने फेर सर्वेक्षण करण्यासाठी एका खाजगी संस्थेची नियुक्ती केली होती. या संस्थेचे कर्मचारी घरोघरी जावून नागरीकांकडून माहिती जमा करत होते, परंतू बऱ्याच ठिकाणी ही माहिती भरुन झाल्यानंतर त्या कर्मचाऱ्यांकडून मालमत्ता पाहुन पैशाची मागणी सुरु झाली, अनेकांनी पैसे सुद्धा दिले, परंतू महापालिकेने आधीच आवाहन केले होते की, ही सर्व माहितीसाठी नागरीकांनी कोणतेही पैसे देवू नये, मग हा काय प्रकार सुरु आहे? तेव्हा अशा संस्थेवर तातडीने कारवाई करुन त्यांना काळ्या यादीत टाकावे अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा हे सुरु असलेले काम बंद पाण्यात येईल, असा इशारा संभाजी कदम यांनी दिला आहे.



महापालिकेच्या वतीने शहर व उपनगरातील सर्व मालमत्तेचे सर्वेक्षण करण्यासाठी नेमलेल्या संस्थेचा ठेका रद्द करण्यात यावा मागणीचे निवेदन आयुक्त यशवंत डांगे यांना देताना शिवसेनेचे शिष्टमंडळ.

## प्रेरणादायी अक्षरधन...

### गिरीश कुलकर्णीची विराणी विशेष...



बेश्ढाय रे गड्या तुझं. आलं ढोंग नाही अभिमान, अहंकार म्हणन काय असतं हे तुझ्या गावी नाही, म्हणजे बघं ना, मला घडीत सगळं तुच्छ वाटतं, अन् गरज पडल्यास मी सर्वांची संगती पटवून देणारी तोंडं वाजवणी करतो. चारचौघात मिरवू पाहतो, अर्धेमुर्धे भोगलेलं, वाचलेलं गरळ ओकेत बरळत असतो.,

पाजळत आलो ओलं अर्धवट अज्ञान बरं, काही अभ्यासावर घाव घालणारा, आत पाहायला भाग पाडणारा प्रश्न पडला की बजतो, निराग होतो. कुढतो. स्वत:शीच. तशीही कुणाशी बोलायची चोरीच. आजूबाजूचे माझ्यच सारखे दाबजोर, मुजोर व ढोंगी. समजावतात मला की माणसानं कसं शेंबड्याल्या माशीगत त्याच त्या स्वार्थाच्या लगद्यात लोळावं. बुद्धीचा कैफ करावा., तोच अर्थ आहे. स्वार्थ !

स्वार्थाशिवाय वेगळं जाणवलेलं, सललेलं सांगता येतच नाही इथे एकमेकांना. तुला सांगतो, आमची बुद्धी ही एक अजब कैद आहे. ती आम्हा माणसांना जन्मानच लाभते. मग ठरतो प्रत्येकाच्या कोठडीचा आकार खिडकी, दार... हवा यावी की घुसमट व्हावी...खरं म्हणजे ही कोठडी फोडायची जाणीव बिणी व सुद्। थोतांडच आहे. वेदना तेवढी खरी-अस्सल. तिचं अस्तित्त्व स्वयंसिद्ध आहे. ती वेदनेइतकी जन्माच्या मुळाशी चिकटलेली असते. ती पोटभर भोगल्याशिवाय सुटका नाही? आणि सुटकेचा क्षणही बहुधा वेदनेतूनच मिळतो म्हणतात.

या वेदनेतून सुटका, एकूणच जन्म मृत्युच्या खेळात सुटका हेच आहे का सार्थक! हे जाणून तू आता मुक्त प्रवासास निघ. घाबरू नकोस. मी तुला एकटं सोडत नाहीए. माझी कैद संपताच मीही निघेनच. मग आपण भेटू तेव्हा दोन नाही तर एकच असू, मग तुला आजवरचं माझे सगळं कळेल. आंतरिक उमाळ्यानं कडकडून भेटू तेव्हा त्यात कसलाच स्वार्थ नसेल.

तो जो कोणी निसर्ग म्हणून निर्माता आहे त्याचे ठायी निर्विकार, अविचल शांतता आहे ती अनुभवता आले तर जीवनाचं गमक उमगेल.

# एस टी बसेसमुळे नगर शहरात वाहतूक कोंडी, परिस्थितीत सुधारणा न झाल्यास 'आंदोलन'

नगर - शहरातील वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरत असलेल्या एस.टी. बसेसच्या अनियमित वाहतुकीबाबत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रकांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आ. संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले. वाडिया पार्कसमोरील टिळक रोड परिसरात नगर-पारनेर आणि कल्याण-भिवंडी मार्गावरील बसेस माळीवाडा किंवा पुणे बसस्थानकात जाण्यासाठी टिळक रोड मार्गे धावतात. त्यामुळे शहरात नेहमीच वाहतूक कोंडी जाणवते. वाहतूक कोंडीच्या समस्येबाबत एस.टी. विभाग नियंत्रकांना निवेदन देण्यात आले. यात सुरेश बनसोडे, अंकुश मोहिते, पप्पू पाटील, सिद्धार्थ आढाव, संजय दिवटे आणि समीर भिंगारदिवे यांचे स्वाक्षरी आहे.


वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरत असलेल्या एस.टी. बसेसच्या अनियमित वाहतुकीबाबत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रकांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने निवेदन देण्यात आले.

या समस्येवर उपाय म्हणून तारकपूर आगारातून सुटणाऱ्या आणि परत येणाऱ्या बसेसना दिल्ली गेट मार्गे नेप्ती नाक्यावरून वळवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, विदर्भ व मराठवाडा दिशेने येणाऱ्या बसेस उज्वल कॉम्प्लेक्सजवळ थांबून प्रवाशांना उतरवतात, जे स्टेशन रोडवरील वाहतूक वाढीस कारणीभूत ठरते. या बसेस थेट माळीवाडा किंवा पुणे स्थानकात गेल्यास स्टेशन रोडवरील ताण कमी होईल, असे निवेदनकर्त्यांचे म्हणणे आहे.

या समस्येकडे वेळेवर लक्ष दिले नाही, तर भविष्यात होणाऱ्या अपघातांना एस.टी. प्रशासन जबाबदार असेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आठ दिवसांत परिस्थितीत सुधारणा न झाल्यास विभाग नियंत्रक कार्यालयात आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## स्पॅनिश परिक्षेत नगरचे डॉ. सुरेश खरात उत्तीर्ण



नगर - न्यू आर्टस्, कॉमर्स, सायन्स, नगर कॉलेजच्या इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ. सुरेश खरात हे स्पॅनिश भाषेच्या फौंडेशन कोर्स (लेवल ३) ची पुणे विद्यापिठाची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. इंग्रजी विभागातून निवृत्त झाल्यांनतर सुद्धा त्यांनी स्पॅनिश भाषेचा अभ्यास सुरु ठेऊन हे यश संपादन केले आहे.

डॉ. खरात यांची इंग्रजीमध्ये दोन पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. ते इंग्रजी विषयाचे पी. एच. डी. गाईड होते. त्यांचे स्पेनच्या देऊस्तो विद्यापीठात आणि बँकॉकच्या फ्रांनखोंन राजभाट विद्यापीठात २०११ आणि २०१२ साली इंग्रजीमध्ये व्याख्याने झालेली आहेत. पुणे विद्यापीठ अंतर्गत असंख्य महाविद्यालयात तसेच नांदेड विध्यापिठात त्यांची व्याख्याने झालेली आहेत.

## धनादेश वटला नाही; कर्जदारास दोन महिने शिक्षा व एक लाख पन्नास हजार रुपयांचा दंड

नगर - येथील श्री चौण्डेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था, भिंगार यांचेकडून कर्जदार राहुल पोपटलाल बोरा रा. सौरभ नगर, भिंगार, अहमदनगर यांनी सन २०११ मध्ये रक्कम पन्नास हजार रुपये कर्ज घेतले होते. सदर कर्जदाराने कर्ज न भरल्याने कर्जाची थकबाकी वाढत गेली, सदर कर्ज पतसंस्थेने मागणी केली असता घेतलेल्या रक्कमेच्या फेडीपोटी रक्कम ९०,००० रुपयाचा धनादेश फिर्यादी संस्थेस आरोपीने दिला होता. सदरचा धनादेश फिर्यादी यांनी त्यांचे खात्यात वटविण्यासाठी भरला असता तो चेक न वटता परत आला, सदर फिर्यादी संस्थेस त्यांचे पैसे मिळाले नाहीत. म्हणून फिर्यादी संस्थेने अहिल्यानगर येथील चिफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब, अ.नगर यांचे कोर्टात निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्ट चे कलम १३८ प्रमाणे फिर्याद ॲड. सचिन गोकूळ धिमते यांच्या मार्फत दाखल केली होती. सदर केसची सुणावणी अहिल्यानगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे समोर झाली. फिर्यादी संस्थेतर्फे अजय गणेश गारदे यांची साक्ष नोंदविण्यात आली. तसेच आवश्यक तो कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आला. फिर्यादीची गुणदोषावर सुनावणी होऊन आरोपी राहुल पोपटलाल बोरा यास दोषी धरुन त्याला न्यायालयाने निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे दोषी धरुन दोन महिन्याची साधी कैद व एक लाख पन्नास हजार रुपये दंड फिर्यादीस नुकसान भरपाई म्हणून देण्याचा आदेश केला. सदरची दंडाची रक्कम न दिल्यास आणखी एक महिने कारावासाची शिक्षा दिली आहे.

फिर्यादी श्री चौण्डेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था यांच्यातर्फे ॲड. सचिन गोकूळ धिमते यांनी कामकाज पाहिले, व सदर केसमध्ये त्यांना ॲड. रुपेशकुमार जि. भामरे, ॲड. तुषार शेंडगे यांनी सहकार्य केले.

# रेशन धान्य मिळत नसल्याने परवानाधारक दुकानावर कारवाई करा अन्यथा आंदोलन

नगर - दरेवाडी येथील सरकार मान्य स्वस्त धान्य दुकान मध्ये दरेवाडी, गोकुळवाडी, तुक्कड ओढा, हरीमळा आदी भागात नागरिकांना रेशन धान्य मिळत नसल्याने जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांना निवेदन देताना रिपब्लिकन सेनेचे जिल्हा अध्यक्ष सुनील शिंदे, महेश भोसले आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, सरकारमान्य परवानाधारक दुकानांमध्ये नियमितपणे रेशन मिळत नसल्याने सदर भागातील नागरिक नेहमीच त्रस्त असतात तसेच शासकीय आदेशानुसार महिन्यातील प्रत्येक दिवशी आठ तास दुकान उघडे असावे असा शासनाचा आदेश आहेत तसेच गावाच्या आठवडे बाजाराच्या दिवशी दुकान उघडे असावे असा देखील शासनाचा आदेश आहे. याबाबतीत परवानाधारक दुकानदाराने फलक लावलेला आहे. त्या फलकावर शासकीय आदेशानुसार दररोज आठ तास व आठवडा बाजाराच्या दिवशी दुकान पूर्ण वेळ उघडे राहील मात्र प्रत्यक्षात सदर दुकान हे महिन्यातील केवळ तीन ते चार दिवसच उघडे असते त्यातही नागरिकांना वेळेवर धान्य वितरित होत नाही तसेच तीन महिन्याच्या धान्याऐवजी केवळ एक महिन्याचे धान्य नागरिकांना देण्यात येते वरील सर्व गोष्टी लक्षात घेता महिन्याभरात कुपन धारकांना प्रतिव्यक्ती किती धान्य वितरित केले जाते याचा लेखी अहवाल देउन भागातील लोकांना वेळेवर धान्य वितरित केले जाते किंवा नाही याचा देखील अहवाल देण्यात यावा व नागरिकांच्या होणाऱ्या गैरसोई बाबत सदर परवानाधारक दुकान यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली अन्यथा कारवाई न झाल्यास रिपब्लिकन सेनेच्या वतीने आंदोलन करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे.

### बिपीनभाई पटवा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - खिस्तगल्ली येथील रहिवासी व नवकार फुडस्चे संचालक बिपीनभाई लालचंद पटवा (वय ८३) यांचे १४ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे २ मुले, सुना, नातवंडे, २ भाऊ, भावजया असा परिवार आहे. जयेश, दर्शन पटवा यांचे ते वडील होत. श्री जैन श्वेतांबर श्रावक गुजराती समाजाचे माजी ट्रस्टी दर्शन पटवा व जयेश पटवा यांचे ते वडील होत.

### श्रीमती गुलाबबाई गुगळे यांचे निधन



नगर - येथील पेडगाव (ता.श्रीगोंदा) येथील रहिवासी श्रीमती गुलाबबाई शांतीलाल गुगळे (पेडगाववाला, वय ८२) यांचे १४ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यावर पेडगाव भिमातिरी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राजेंद्र, प्रकाश गुगळे यांच्या त्या मातोश्री होत.

### जुने कापड व्यापारी शरद चांडवले यांचे निधन



नगर - जिल्ह्यातील जुने कापड व्यापारी शरद तुकाराम चांडवले (वय ७९) यांचे ११ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे. बांधकाम व्यवसायिक संजय चांडवले यांचे ते वडील होत.

### बाळासाहेब बोर्डे यांचे आजाराने निधन



श्रीरामपूर - श्रीरामपुरातील पूर्वीचे महाराष्ट्र प्रिंटींग प्रेसचे मालक बाळासाहेब रामराव बोर्डे (वय ८२) यांचे १४ जुलै ला दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार देहदान करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, दोन भाऊ, सून, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. शिवाजीराव बोर्डे (पुणतांबा) व प्रतापराव बोर्डे (पुणे) यांचे बंधू, ॲड. राजेश बोर्डे, लीना व अर्चना बोर्डे यांचे वडील, स्व.दिनकरराव बोर्डे यांचे ते बंधू होत.

# नगर शहरात वैद्यकीय पदवी नसतानाही रुग्णांवर उपचार, शस्त्रक्रिया करणाऱ्या तिघा बोगस डॉक्टरांवर गुन्हा दाखल


### महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून दोन्ही क्लिनिकमध्ये छापा टाकून तपासणी

नगर - वैद्यकीय पदवी नसताना, वैद्यकीय व्यावसायिक नसताना दवाखाना चालवून, रुग्णांवर शस्त्रक्रिया करणाऱ्या, ॲलोपॅथीची औषधे देणाऱ्या तिघा बोगस डॉक्टरांवर तपासणी करून महानगरपालिकेने कारवाई केल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली. याप्रकरणी तिघाही बोगस डॉक्टरांवर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत कायदेशीर फिर्याद देऊन गुन्हा दाखल करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

पिंजारगल्ली येथील डॉ. ठाकूर क्लिनिक, चाँदसी दवाखाना डॉ. एम. डी. हालदार येथील ओम संतोष ठाकुर (रा. पिंजार गल्ली, अहिल्यानगर), मृत्युंजय धनंजय हालदार व त्यांचा मुलगा संजय मृत्युंजय हालदार (दोघे रा. पिंजार गल्ली, अहिल्यानगर) वैद्यकीय पदवी नसताना वैद्यकीय व्यवसायाचा परवाना नसताना बेकायदेशीरपणे रुग्णांची तपासणी करत असल्याचे त्यांच्यावर उपचार व शस्त्रक्रिया करत असल्याचे माहिती आरोग्य सेवा रुग्णालय (राज्यस्तर) मुंबई येथून महापालिकेच्या आरोग्य विभागाला मिळाली होती. त्यानुसार महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना या संदर्भात कारवाईच्या सूचना देण्यात आले होत्या. प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉक्टर सतीश राजुरकर यांनी महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दिलीप बाबासाहेब बागल, वैद्यकीय सहायक डॉ. कविता गणेश माने, मुख्य लिपीक सचिन अरुण काळभोर, वरिष्ठ परिचारिका स्नेहलता संजय पारधे-क्षेत्रे यांना तपासणी करून कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

डॉ. बागल यांच्या पथकाने १ एप्रिल रोजी पिंजारगल्ली येथे जाऊन दोन्ही क्लिनिकवर छापा टाकला. यावेळी संशयित बोगस डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करताना आढळून आले. तेथील रुग्णांकडे चौकशी केली असता, संशयित बोगस डॉक्टरांनी त्यांच्यावर मूळव्याध, भगंदर, फिशर आदी आजारांवर शस्त्रक्रिया केल्याचे समोर आले. पथकाने त्यांच्याकडे वैद्यकीय पदवीची मागणी केली असता, त्यांनी नॅचरोपॅथी, इलेक्ट्रॉपॅथी अशा डिप्लोमा कोर्सेसची प्रमाणपत्रे दाखवली. वैद्यकीय पदवीबाबत, ॲलोपॅथी उपचार, शस्त्रक्रियाबाबत कोणतीही पदवी दाखवली नाही. त्यानंतर डॉ. बागल यांच्या पथकाने रीतसर पंचनामा करून अहवाल सादर केला. त्यानुसार प्राथमिक तपासणीनुसार तिघा बोगस डॉक्टरांवर कोतवाली पोलिस ठाण्यात महानगरपालिकेच्या वतीने डॉक्टर बागल यांच्यामार्फत फिर्याद दाखल करण्यात आली असल्याचे यशवंत डांगे यांनी सांगितले.

# बोगस डॉक्टरांना आळा घालण्यासाठी नव्या कायद्याची गरज : सत्यजित तांबे



नगर - राज्यात बोगस डॉक्टरांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. विशेषतः ग्रामीण, आदिवासी पाडे आणि शहरी झोपडपट्ट्यांमध्ये बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट वाढल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर, बोगस डॉक्टरांना प्रतिबंध घालण्यासाठी नवीन आणि अधिक प्रभावी कायदा तयार करण्याची आवश्यता असल्याचे आमदार सत्यजीत तांबे यांची सभागृहात अधोरेखित केले. राज्यमंत्री मधुरी मिसाळ यांनी देखील समिती नेमण्यात येईल असे सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील मोसम परिसरात कार्यरत वैद्यकीय संघटनांनी अशा बोगस डॉक्टरांविरोधात आवाज उठवला आहे. या भागात 'महाराष्ट्र रुरल हेल्थ असोसिएशन' नावाची एक संस्था चालवली जाते. या संस्थेद्वारे बनावट डॉक्टरांना बोगस सर्टिफिकेट वाटप केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही संस्था स्वतःला वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनशी संलग्न असल्याचा खोटा दावा देखील करत आहे. राज्यात बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यासाठी पोलिसांना अधिक अधिकार देण्याची मागणी केली. यासाठी पोलिस महासंचालक, वैद्यकीय सचिव आणि संबंधित खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक बोलावण्याची आवश्यकता आ. सत्यजीत तांबे यांनी मांडली.

तत्कालीन आरोग्यमंत्री गिरीश महाजन यांनी डिसेंबर २०२२ च्या अधिवेशनात बोगस डॉक्टर प्रतिबंधक कायदा आणण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आजतागायत तो कायदा अस्तित्वात आला नाही. सध्याचा कायदा प्रभावी नसल्याने त्यात सुधारणा करण्याची निकड निर्माण झाली असल्याचे आमदार सत्यजीत तांबे यांनी म्हटले.

राज्य शासनाने बोगस डॉक्टर ओळखण्यासाठी QR कोड प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही प्रणाली केवळ शहरी भागापुरती मर्यादित न ठेवता गावपातळीवर तसेच आदिवासी पाड्यांमध्ये देखील बंधनकारक केली जाणार आहे. त्यामुळे कोणताही डॉक्टर हा अधिकृत आहे की बोगस, याची तात्काळ शहानिशा करता येईल. त्याचबरोबर बोगस डॉक्टरांविरोधातील कायद्यात सुधारणा करण्यासाठी पोलीस विभाग, आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल आणि इंडियन मेडिकल कौन्सिल यांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली समिती लवकरच गठीत केली जाणार आहे. ही समिती कायद्यात कोणते बदल आवश्यक आहेत, याविषयी सूचना देणार असल्याचे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सभागृहात स्पष्ट केले.

राज्यातील अनेक बोगस डॉक्टरांविरोधात गुन्हे दाखल असले तरी ते तीन-चार वर्षांपासून प्रलंबित आहेत. त्यामुळे कायदेशीर बाबी अधिक प्रभावी करण्यासाठी शासन सज्ज होत आहे. दरम्यान, बागलाण तालुक्यातील बोगस डॉक्टरांविरोधात लवकरात लवकर योग्य ती कारवाई केली जाईल, असे आश्वासनही मंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

## रक्कम परत मिळण्यासाठी नगर अर्बन बँकेच्या खातेदार, ठेवीदारांनी केवायसी पूर्ण करावी

### सभासद राजेंद्र चोपडा यांचे आवाहन

नगर - रिझर्व्ह बँक व केंद्रीय निबंधक विभागाच्या परवानगीनुसार नगर अर्बन को ऑप. मल्टीस्टेट बँकेच्या ठेवीदारांना दिलासा मिळाला आहे. ५ लाखांपेक्षा अधिक रकमेच्या ठेवी असलेल्या खातेदार, ठेवीदारांना ५० टक्के रक्कम परत मिळण्यास सुरुवात झाली आहे. आतापर्यंत संगमनेर, श्रीगोंदा, श्रीरामपूर, शेवगाव, बेलापूर येथील खातेदारांना पैसे परत मिळाले आहेत. नगर शहर व इतर शाखेतील ठेवीदारांनाही रक्कम परत करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. अजूनही सुमारे ५५० ठेवीदार, खातेदारांचे अर्ज केवायसी प्रक्रिया पूर्ण न केल्याने प्रतीक्षेत आहेत. त्यांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घेण्याचे आवाहन बँकेचे सभासद राजेंद्र चोपडा व बँक बचाव कृती समितीने केले आहे.

राजेंद्र चोपडा यांनी म्हटले आहे की, बँकेचे अवसायक गणेश गायकवाड व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष प्रयत्न व बँक बचाव समितीचा पाठपुरावा यामुळे पाच लाखांहून अधिक रक्कम असलेल्या ठेवीदारांना खातेदारांना निम्मी रक्कम मिळण्यास सुरुवात झाली आहे. ठेवीदार, खातेदारांना त्यांच्या हक्काचे पैसे परत मिळत असल्याचा आनंद होत आहे. व्यापक सार्वजनिक हित लक्षात घेऊन आम्ही सातत्याने या प्रश्नी आवाज उठवून पाठपुरावा करीत आहोत. त्याचे चांगले परिणाम पहायला मिळत आहेत याचा विशेष आनंद होत आहे. सर्वसामान्यांना त्यांच्या कष्टाची रक्कम परत मिळणे हा त्यांचा हक्क आहे. तो मिळवून देण्यासाठी सातत्याने पत्र व्यवहार, पाठपुरावा करीत आहोत. बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांच्यासह अधिकारी काळे, औटी, योगेश कुलकर्णी, अंतुले भंडारी, प्रितम लोढा यांच्यासह कर्मचारी परिश्रम घेत आहेत. त्यांचेही आभार मानले पाहिजेत. आणखी पात्र ठेवीदार, खातेदारांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घेण्याचे आवाहन चोपडा यांनी केले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### पावसाळ्यात खा कणीस

पावसाळा सुरू झाला आहे. या ऋतूमध्ये आपल्याला आपल्या खाण्यापिण्याची आणि जीवनशैलीची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. थोडासा निष्काळजीपणा आरोग्यासाठी खूप हानिकारक ठरू शकते. आरोग्य तज्ञांच्या मते, या ऋतूमध्ये अनेक आजारांचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत तुम्ही कॉर्नचे सेवन करू शकता. कणीस हे केवळ चविष्ट नाही तर आरोग्यासाठी फायदेशीर आहे. कॉर्नमध्ये भरपूर जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट्स असतात जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात आणि बद्धकोष्ठतेपासून आराम देतात. कॉर्न खाल्ल्याने बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. कॉर्नमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे ते शरीरातील बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास मदत करते. तसेच कॉर्नमध्ये असलेले जीवनसत्त्वे नवीन पेशी तयार करतात.

## पाककला

### फ्लॉवर बटाटा फ्राय

**साहित्य :** १/२ किलो फ्लॉवर, २ मध्यम बटाटे, २ टोमॅटो, २ टीस्पून तिखट आवडीनुसार, २ टीस्पून धने पावडर, १ टीस्पून साखर, मीठ चवीनुसार,, कोथिंबीर बारीक चिरलेली, १ टीस्पून आल्याचे तुकडे, चार-पाच कढीपत्त्याची पाने, फोडणी करता तेल, मोहरी, जीरे, हिंग, हळद

**कृती :** प्रथम फ्लॉवर स्वच्छ धुऊन त्याचे मध्यम आकाराची फुले किंवा तुरे काढून घ्या. तसेच बटाटा आणि टोमॅटोच्या मध्यम फोडी करून घ्या. आले, कोथिंबीर बारीक चिरून घ्या. आता एका कढईमध्ये तेल घालून ते तापले की त्यात मोहरी, जीरे, हिंग, हळद घालून खमंग फोडणी करा. आता त्यामध्ये आल्याचे तुकडे, कढीपत्ता व थोडी कोथिंबीर घालून व्यवस्थित परतून घ्या. नंतर त्यामध्ये बटाट्याच्या फोडी घालून त्या सोनेरी रंगावर परतून घ्या आणि नंतरच टोमॅटो घालून टोमॅटो पूर्ण शिजवून घ्या. आता टोमॅटो शिजले की यामध्ये तिखट आणि धने पावडर घाला आणि छान पैकी परतून घ्या. नंतर यामध्ये साखर, मीठ घालून पुन्हा व्यवस्थित परतून घ्या आणि मग फ्लॉवरचे तुरे घालून भाजी परत व्यवस्थित परतून घ्या. नंतर भाजीवर पाण्याचा हबका मारून झाकण ठेवून मंद आचेवर भाजी पूर्णपणे शिजवून घ्या. वरून भरपूर बारीक चिरलेली कोथिंबीर घाला. भाजी तयार आहे.

## वास्तू

* स्वयंपाकघरात उघडी कचरापेटी किंवा जास्त काळ कचरा ठेवणे टाळावे. यामुळे नकारात्मक ऊर्जा वाढते आणि आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. डस्टबिन नेहमी झाकणासह ठेवावी आणि नियमितपणे स्वच्छ करावी.

* स्वयंपाकघरात देवतांच्या मूर्ती, फोटो किंवा धार्मिक चिन्हे ठेवू नयेत. वास्तुशास्त्रानुसार, स्वयंपाकघर हे अग्नी तत्त्वाचे स्थान आहे, तर पूजास्थान हे शांत आणि सात्विक ऊर्जेचे स्थान आहे. यामुळे दोन्ही ठिकाणच्या ऊर्जेत बाधा येते.

## सल्ला

काटा टोचला असेल तर त्या जागेवर पाण्यात थोडे हिंग मिसळून लावा काही वेळाने काटा बाहेर येईल.

## सौंदर्य

कडुलिंबामध्ये बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ गुणधर्म असतो आणि कोरफड त्वचेला थंड आणि मॉइश्चरायझ करते. तुम्ही कडुलिंबावर आधारित साबण किंवा कोरफड जेल वापरू शकता. याने पावसाळ्यातही चेहऱ्यावर तजेजा राहिल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. १६ जुलै २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, उ.भा.२८।५१, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** मनावरील दडपण दूर. अनुसंधानातून कार्यक्षेत्रात प्राप्ति योग.

**वृषभ :** अध्ययनात रूचि वाढेल. कामांची प्रशंसा होईल. भागीदारी पक्षात होऊ शकते.

**मिथुन :** कार्यक्षमता वाढल्याने उत्साह वाढेल. अभीष्टसिद्धी होईल. फायदा होईल. विरोधक करार करतील.

**कर्क :** पाठबळ मिळेल. मनाला प्रसन्नता वाटेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल. आनंदाची बातमी मिळेल.

**सिंह :** काळजीपूर्वक काम करा. कोणतेही काम एखाद्यावर विसंबून राहून करू नका. आरोग्य नरम-गरम राहील.

**कन्या :** भागीदारीतून विशेष लाभ. उपजीविकेच्या स्त्रोतातून लाभ होईल, लोकप्रियतेत वृद्धि होईल.

**तूळ :** अर्थप्राप्ती झाल्याने खर्चाचे प्रश्न सुटतील. अध्ययनात छान यश.

**वृश्चिक :** परिश्रमाने कामाचे शुभ परिणाम येतील. व्यापारात बुद्धिमत्ता, दूरदर्शितेची प्रशंसा होईल.

**धनु :** अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील. कार्यक्षेत्राचा विकास आणि विस्तार होईल.


**मकर :** धर्म, आध्यात्मात रूचि वाढेल. अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहील. व्यापार राहील.

**कुंभ :** मनाला प्रसन्नता वाटेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. विवाह योग, घरात शुभ मांगलिक कार्ये.

**मीन :** व्यापारिक भागीदारीसाठी उत्तम वेळ. अधिकारांचा योग्य वापर कराल. स्पर्धा, पैजा जिंकू शकाल. लाभ होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२२१ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२२० चे उत्तर



**आडवे शब्द :** - १) 'ऑफिसर'चे मराठी रूप ४) तऱ्हा; पद्धत; भेद; वर्तणूक ७) पक्व; कच्चा नसलेला ८) सह्याद्रीच्या पायथ्यापासून समुद्रापर्यंतचा दक्षिणेकडचा प्रदेश; कोकणपट्टीचा दक्षिण भाग ९) आघात; जखम; घाव १०) जोम; शक्ती; व्यायामाचा एक प्रकार ११) पायात घालावयाचा एक दागिना; काकडा १२) ओळ; लाईन १३) विष्णूचा तिसरा अवतार १४) बिनथाटामाटाचा; अनलंकृत १५) भवन; इमारत; बिल्डिंग १६) फुलातील गोड रस; मकरंद १८) प्रेम; ममता १९) खात्री; विश्वास; भरवसा २०) नूतन; नवा २१) गुन्हेगाराचे हातपाय अडकविण्यासाठी बनविलेली लाकडी चौकट

**उभे शब्द :-** १) नियम म्हटला की हा आलाच; नियमाला बाधक गोष्ट २) तिरस्कार; निषेध ३) रीतीला धरून; पद्धतशीर ४) क्षोभ; दंगा ५) एक पक्षी; वायस; कावळा; काग ५) लष्काराचे एक वाहन १०) एक मराठी आडनाव ११) संकट; आपत्ती; अरिष्ट; बला १२) शिजविलेले अन्न; शिजवून केलेले मिश्रण; पाक १३) कोणतेही सामान; पदार्थ १४) कोणत्याही वस्तू १५) वायफळ; व्यर्थ १७) पाणी अडविण्यासाठी नदीच्या पात्रात वगैरेत बांधलेली आडवी भिंत १८) गळ्याची मागची बाजू; आदर १९) कामाला मारलेली दांडी

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** आपल्या अपेक्षा जेवढ्या कमी असतील तेवढे आपले आयुष्य सुंदर बनेल.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### वीणा, सतार, गिटार... तिन्ही तंतुवाद्यच; पण प्रत्येकातून वेगळा आवाज कसा काय येतो?

वीणा, सतार, गिटार ही तिन्ही वाद्यं तारांपासून तयार केली जातात; पण तिन्हींमधून निर्माण होणारं संगीत वेगळं असतं.

संगीतात अनेक प्रकारची वाद्यं वाजवली जातात. तंतुवाद्य, चर्मवाद्य, फुंकर घालून वाजवण्याची वाद्य अशी विविध प्रकारची वाद्यं असतात; मात्र प्रत्येक वाद्याचा आवाज युनिक असतो. म्हणजेच एकाचा आवाज दुसऱ्याच्या आवाजासारखा नसतो. सतार, गिटार, वीणा ही तिन्ही तंतुवाद्यं असूनही, त्यातून निर्माण होणारे आवाज वेगवेगळे असतात. त्यामागचं कारण जाणून घेऊ या.

सतार, गिटार आणि वीणा ही सगळ्यात जास्त ऐकल्या जाणाऱ्या वाद्यांपैकी काही वाद्यं आहेत. ही वाद्यं तारांपासून नादनिर्मिती करतात. तिन्ही वाद्यांमध्ये वेगवेगळ्या आकाराच्या तारा लावलेल्या असतात; मात्र त्यातून निघणारे आवाज अद्भुत आणि वेगवेगळे असतात. त्यामागे काय कारण असेल?

सतार, गिटार आणि वीणा ही लोकप्रिय वाद्यं आहेत. भारतीय संगीतात या वाद्यांच्या आधारे गेल्या अनेक दशकांपासून संगीतनिर्मिती करण्यात आली आहे. ही तिन्ही वाद्यं तारांपासून तयार केली जातात; पण तिन्हींमधून निर्माण होणारं संगीत वेगळं असतं.

सतार हे एक जुनं व लोकप्रिय वाद्य आहे. यात १३ तारा असतात. भारतीय संस्कृतीबाबत माहिती देणाऱ्या अधिकृत वेबसाइटनुसार, सतार बनवण्यासाठी तून, धातू, तुमडी आणि चिकोरी यांचा वापर केला जातो. संपूर्ण उत्तर भारतात शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमांमध्ये सतारीचा वापर केला जातो. यात डाव्या हाताच्या बोटांद्वारे तारांमधून सूरनिर्मिती करता येते.

वीणा या वाद्याला खूप मोठा इतिहास आहे. आपल्याकडे सरस्वतीदेवीच्या हातात वीणा दिसते. याचाच अर्थ हे वाद्य खूप जुनं व पारंपरिक वाद्यांपैकी एक आहे. जॅकवूड झाडाच्या लाकडापासून वीणा तयार केली जाते. तिची लांबी १.५ मीटर असते. त्यात २४ ब्रास असतात. त्याशिवाय वीणा मूलतः ४ तारांची असते. सतार, गिटार आणि बँजो या वाद्यांची निर्मिती वीणेपासूनच झाली असल्याचं बोललं जातं. वीणेचा उल्लेख अनेक पौराणिक साहित्यात आढळतो. वीणेचे काही प्रकारही आहेत. वीणेचे सूर इतके मधुर असतात, की मनातली निराशा, मनावरचं मळभ नष्ट होतं असं म्हणतात.

गिटार हे देखील तारा असलेलं वाद्य आहे. गिटार महोगनी, ॲश, मॅपल, बासवूड, अगाथिस, एल्डर, पोपलर, अक्रोड, स्प्रूस आणि होली यांच्या लाकडापासून तयार केलं जातं. यात ६ तारा असतात. प्लेक्ट्रम किंवा बोटांच्या साह्यानं या तारा वाजवून आवाजाची निर्मिती केली जाते. गिटार या वाद्यामध्ये आता अनेक प्रकार आहेत.

वीणा आणि सतार यांच्या तुलनेत गिटार लहान असते. तसंच या तिन्ही वाद्यांचे आकार वेगवेगळे असतात. त्यामुळे त्यावरच्या तारांचं डिझाइन वेगवेगळं असतं. याच कारणामुळे या तिन्ही वाद्यांमधून वेगवेगळा आवाज येतो.

## संघर्ष

एकदा एक शेतकरी देवावर खूप रागावला! कधी पूर यायचा, कधी दुष्काळ असायचा, कधी सूर्य खूप गरम असायचा तर कधी गारपीट व्हायची! प्रत्येक वेळी, कोणत्या ना कोणत्या कारणाने, त्याचे पीक खराब व्हायचे!

एके दिवशी, खूप कंटाळून, तो देवाला म्हणाला, पहा प्रभु, तुम्ही देव आहात, पण तुम्हाला शेतीबद्दल फारसे माहिती नाही असे दिसते, माझी एक विनंती आहे, मला एक वर्षासाठी संधी द्या, हवामान माझ्या इच्छेनुसार असू द्या, मग तुम्ही पहाल की मी धान्याच्या कोठारात धान्य कसे भरतो! आता यावर देव हसला आणि म्हणाला ठीक आहे, मी तुम्हाला जसे सांगतो तसे हवामान देईन, मी हस्तक्षेप करणार नाही! शेतकऱ्याने गव्हाचे पीक पेरले, जेव्हा त्याला सूर्यप्रकाश हवा होता, त्याला सूर्यप्रकाश मिळायचा, जेव्हा त्याला पाणी हवे होते, त्याला पाणी मिळाले! त्याने कडक उन्हा, गारा, पूर, वादळ येऊ दिले नाही, कालांतराने पीक वाढले आणि शेतकरी देखील आनंदी होता, कारण असे पीक आजपर्यंत कधीही आले नव्हते! शेतकऱ्याने स्वतःशी विचार केला की आता देवालाच कळेल की पिके कशी वाढवायची, तो इतक्या वर्षांपासून आम्हा शेतकऱ्यांना विनाकारण त्रास देत आहे.

कापणीची वेळ आली, शेतकरी मोठ्या अभिमानाने पीक कापायला गेला, पण कापणी सुरू होताच तो अचानक छातीवर हात ठेवून बसला! गव्हाच्या कोणत्याही कणात गहू नव्हता, सर्व कण आतून रिकामे होते, खूप दुःखी होऊन त्याने देवाला विचारले, प्रभु काय झाले?

मग देव म्हणाला, हे होणारच होते, तुम्ही रोपांना संघर्ष करण्याची थोडीशीही संधी दिली नाही.

ना त्यांना कडक उन्हात जळू दिले, ना त्यांना वादळ आणि गारपिटीशी लढू दिले, त्यांना कोणत्याही प्रकारचे आव्हान जाणवू दिले नाही, म्हणूनच सर्व झाडे पोकळ राहिली, जेव्हा वादळ येते, मुसळधार पाऊस पडतो, गारा पडतात, तेव्हा वनस्पती स्वतःच्या ताकदीवर उभी राहते, ती आपले अस्तित्व वाचवण्यासाठी संघर्ष करते आणि या संघर्षातून निर्माण होणारी शक्ती त्याला शक्ती, ऊर्जा देते, त्याचे चैतन्य वाढवते. आता मात्र शेतकऱ्याला देवाचे म्हणणे पटले होते व त्याने देवाची माफी मागितली.

तात्पर्य : जीवनात तेजस्वी आणि प्रतिभावान बनायचे असेल तर संघर्ष आणि आव्हानांना तोंड द्यावे लागते.

## जीवन का अमृत (भाग १)



इस सांसारिक जिंदगी के जो बेशकीमती क्षण आध्यात्मिक अभ्यासों में लगतें हैं, वे जिंदगी और मौत के चक्र से मुक्ति दिलाने में अति महत्त्वपूर्ण हैं। भजन-सिमरन में प्रेम पूर्वक समर्पित रहो, और नियमित हो जाओ, क्योंकि यह धुरी है, जिसके चारों ओर सारी पवित्र शिक्षाएँ घूमती हैं और इसी के द्वारा आत्मा का चहुँमुखी विकास होता है। मुझे खुशी है कि आपको स्थायी भजन-सिमरन की दात मिली है। और आप दिव्य रोशनी देखते हैं और घंटियों की सुरीली आवाज़ सुनते हैं। आवाज़ कम नहीं होती जैसा कि आपने कहा है, पर यह एकाग्रता है जो कम हो जाती है और अगर ध्यान एक जगह टिक जाए, बिना किसी फिक्र के या शरीर और

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

बाहरी दुनिया के ख्यालात के, तो आप पायेंगे कि यह आवाज़ की धारा तीव्र हो जाती है, पास आ जाती है और अंत में आपकी आत्मा को अंतर में सतुरु के नूरी स्वरूप तक ले जाती है। एक बिन्दु पर ध्यान टिकाने से और पवित्र शब्द में खो जाने से मन के भटकने को काबू में किया जा सकता है। मुझे खुशी है कि आप प्रेम पूर्वक भजन सिमरन के समर्पित हैं; परिणामस्वरूप आपको दिव्य ज्योति और बड़ी घंटियों की पवित्र आवाज़ की भेंट मिली है। आपके चेहरे का, भजन सिमरन के समय आंशिक रूप से सुन्न होना स्वाभाविक है, क्योंकि सुरत की धारा पवित्र सिद्ध नामों के जाप से, निचले शरीर से सिमटकर दिव्य चक्षु पर पहुँच जाती है।

यह एक अच्छा लक्षण है और इससे डरने की कोई बात नहीं, क्योंकि अगर आप दिव्य चक्षु पर पूरी तरह ध्यान टिकाने की पवित्र प्रक्रिया सीख जाएँगे, तो आप सतुरु की दया से इसे महसूस नही करेंगे। यह फायदेमंद होगा कि आप दोनों अभ्यासों में बराबर का समय दें और इस प्रकार जल्द ही आपका भजन सिमरन पक्का हो जाएगा। मुझे खुशी है कि आप आध्यात्मिक अभ्यासों का दुर्लभ आनंद पा रहे हैं। इस सांसारिक जिंदगी के बेशकीमती क्षण, जो भजन-सिमरन में गुजरते हैं, वे सर्वोत्तम प्रकार से प्रयोग किए गए क्षण हैं और अंत में किसी इंसान को जन्म-मरण के चक्र से मुक्त कराने में मराहनीय ढंग से काम आते हैं। भजन सिमरन में आंतरिक अनुभव का न होना या उसमें बाधा

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

बाहर से उसके ठाठ बाठ होंगे परंतु प्यार से वंचित होगा। सदा मन से परेशान रहेगा। भोजन बनाने वाला भी सात्विक होना चाहिये। जो व्यक्ति भोजन बनाता/बनाती है उसके अवगुण उस भोजन में प्रवेश कर जाते हैं और भोजन तामसिक बन जाता है। आज संसार में दुखों का एक यह भी कारण है कि वह ऐसे लोगों के हाथ से बना खाना खा रहे हैं जो दुखों से भरपूर हैं। जो भोजन बनाती है उसे कभी डांट नहीं मारो, बदसलूकी नहीं करो। थोड़ी देर बाद खाने के रुप में तुम्हे वापिस परोस देगी। श्रेष्ट योगी बनने के लिये कोशिश करो दो रोटी खुद बना कर खाओ। शारीरिक व मानसिक परेशानियों की तह में कोई ना कोई चस्का है। खाने का चस्का, पीने का चस्का, विपरीत लिंग लोगो से नाजायज सम्बन्धों का चस्का। निन्दा का चस्का, गपछप का

### आज्ञा चक्र

चस्का, मान शान का चस्का, आलस्य का चस्का, कामचोरी का चस्का, झांकने का चस्का तथा इसी प्रकार के अनेक अन्य चस्के अदूरदर्शिता और मन की मौज करने वाले चस्के लोगो का पद भृष्ट कर देते हैं। अगर हमें योग का चस्का लग जाये तो बुरे चस्के मिट जायेगें।

आज्ञा चक्र - ३३ -

मन- भोजन का प्रभाव

कुछ लोग नौकर से भोजन बनवाते हैं। परंतु उन्हे खाने को नहीं देते। भोजन बनाने वाले नौकर का मन में भोजन खाने का विचार उठता रहता है किंतु उसे भोजन मिलता नहीं। उस भोजन में मानसिक दोष आ जाता है। भोजन बनाने के लिये वही व्यक्ति उचित है जिस का ह्रदय माता के समान विशाल हो। भोजन उस व्यक्ति से बनवाना चाहिये जिसे भोजन बनाने का इशारा मिलते ही भोजन बनाने के लिये खुशी हो। यदि वह मरे मन से भोजन बनाये तो वह भोजन मानसिक रुप से कमजोर बनायेगा।

भोजन किस भाव में खाते हैं। आप आनंदित हो कर खाना खाते हैं या दुखी, उदास और चिंता से भरे हुये रहते हैं। ऐसे भोजन के प्रभाव मन के लिये जहरीले होते हैं। कोई बिल्ली को भोजन खिला रहा था तथा साथ में उस पर एक्सरे मशीन लगा रखी थी। जैसे ही उसके पेट में भोजन पचाने के लिये रस निकले, उस कमरे में एक कुत्ता छोड़ दिया गया। जिसे भौंकते देख कर बिल्ली डर गई और

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**मीनू :** तू खूप बोअर झाल्यावर काय करतेस?

**राणी :** मस्तपैकी मॉलमध्ये जाते, मनभरेपर्यंत शॉपिंग करते, ट्रॉली, काउंटरवरच सोडते आणि घरी येते...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* हैद्राबाद येथील ग्रेने रोबोटिक्सने भारताचा कोणता पहिला स्वदेशी ड्रोण विकसित केला आहे?

- इंद्रलाल

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

सुरुवातीला एक अक्षर किंवा अंक हा मोठ्या आकारात घ्यावा. त्याचा रंग वेगवेगळा असला तरी चालेल. उदा. अ, ब, क, ड अशी किंवा अ, इ, उ, ऊ, १, २, ३, ४ असे पहिले तीन महिने दाखवावेत. पुढील तीन महिन्यांत नंतर दोन अक्षरी शब्द दाखवावेत. उदा. आई, बाबा, मामा, काका, ताई, दादा, सीए, डीए, एमए, १२, ११, १०, १३, २०, ३० त्यानंतर पुढील तीन महिन्यांत तीन अक्षरी शब्द दाखवावेत.

उदा. कमल, नयन, समर, १२३, २३४, ४५६ त्यानंतर पुढील तीन महिन्यांत चार अक्षरी शब्द, नंतर पाच अक्षरी शब्द बाळाला दाखवून त्याचे

### बौद्धिक विकास कसा करावा?

उच्चार करावेत. सुरुवातीला बाळ काहीच प्रतिसाद देणार नाही.

सुरुवातीला बाळ काहीच प्रतिसाद देणार नाही, परंतु त्याच्या मेंदूमध्ये या सर्व गोष्टी साचून राहतात व थोडे मोठे झाल्यावर साधारणत: दोन वर्षांचे झाल्यावर बाळ सर्वच अक्षरे, अंक ओळखायला लागते. मूल शाळेत जायला लागेपर्यंत त्याला सर्व वाचन जमायला लागते. गणित विषयाची आवड निर्माण होण्यासाठी त्याला अंकज्ञान देणे गरजेचे आहे. भविष्यात गणित विषय अवघड जाऊ नये म्हणून आतापासूनच प्रयत्न करायला हवेत. लहानपणीच गणितासाठी मेंदूच्या पेशी कार्यान्वित करायला हव्यात. म्हणून एक ते पन्नासपर्यंत अंक ओळख झाल्यावर मुलांना बेरीज, वजाबाकी, भागाकार, गुणाकार यांचे ज्ञान द्यावे. सहा वर्षे वयापर्यंत मुले अगदी अवघड गणितसुद्धा सहज सोडवू शकतात. फक्त याकरिता पालकांनीच स्वत: गणित आवडीने मुलांना शिकवायला हवे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००




शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाच्या पालक शिक्षक सहविचार सभेचे दीपप्रज्वलन करताना माजी आमदार दादाभाऊ कळमकर आदी, शेजारील छायाचित्रात उपस्थित असलेले विद्यार्थी.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय गुणवत्तेत राज्यात आघाडीवर

## दादाभाऊ कळमकर यांचे प्रतिपादन, पालक शिक्षक सहविचार सभा उत्साहात; शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

नगर – रयत शिक्षण संस्थेचे लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय गुणवत्तेच्या बाबतीत राज्यात आघाडीवर आहे. संस्थेने देखील गुणवंत शाळांना नेहमीच पाठबळ देण्याचे कार्य केले आहे. रयतमध्ये शैक्षणिक गुणवत्तेशी कधीही तडजोड केली जात नाही. कर्मवीर अण्णांच्या त्यागाची प्रेरणा घेऊन सर्वसामान्य वर्गातील मुलांचे भविष्य घडविण्याचे कार्य सुरु आहे. संस्थेने एआय चा शैक्षणिक कामात समाविष्ट केला असून, सर्व शाळा अद्यावत आणि डिजीटल करण्याचे काम सुरु असल्याचे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर यांनी केले.

शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाच्या पालक शिक्षक सहविचार सभा उत्साहात पार पडली. या सभेत विविध शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. यावेळी कळमकर बोलत होते. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे उत्तर विभागाचे निरीक्षक नवनाथ बोडखे, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, कैलास गुंजाळ, कैलास मोहिते, विष्णूपंत म्हस्के, शामराव व्यवहारे, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिकचे मुख्याध्यापक शिवाजी लंके आदींसह शालेय शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत व रयत गीत सादर करण्यात आले. लक्ष्मीबाई व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करुन सभेला सुरुवात करण्यात आली.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक शिवाजी लंके यांनी शाळेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसह विद्यार्थ्यांचा आहार, आरोग्य, शारीरिक व मानसिक विकास याकडे देखील लक्ष दिले जात असल्याचे स्पष्ट करुन विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी पालक-शिक्षकांमधील संवाद महत्त्वाचा असून, यासाठी पालक शिक्षक संघ महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या सभेत माता-पालक शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करुन त्यांचा सत्कार करण्यात आला.

नवनाथ बोडखे म्हणाले की, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाचे सर्वाधिक विद्यार्थी जिल्हा व राज्याच्या गुणवत्ता यादीत चमकत असून, विद्यार्थ्यांनी गुणवत्ता सिध्द केली आहे. बदलत्या शैक्षणिक धोरणाचा स्विकार करुन व काळाची गरज ओळखून संस्थेत अद्यावत शिक्षणाचे धोरण स्विकारण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

ज्ञानदेव पांडुळे म्हणाले की, शिक्षण हा सामाजिक विषय असून, शिक्षणातून समाज घडणार आहे. पालक व शिक्षकांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचा विकास साधला जाणार आहे. मुलांची बौद्धिक क्षमता वाढलेली असून, त्या दृष्टीकोनाने अद्यावत शिक्षणाची त्यांना गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

उपस्थित पालकांनी पालक सभेत विविश सूचना मांडल्या. शाळेच्या वतीने पालकांना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शिक्षिका मिनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंके, सुजाता दोमल, शितल रोहोकले, जयश्री खांदोडे, सोनाली अनभुले, रुपाली वाबळे, इंदूमती दरेकर, पुनम घाडगे, भाग्यश्री लोंढे, भारती सुसरे, कांचन मदने, विद्या बडवे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप पालवे यांनी केले.

# खर्च कमी उत्पन्नाची हमी; माती जिवंत तर शेती जिवंत



स्वप्निल गांधी

कृषी रसायने साक्षरता अभियान या मोहिमेअंतर्गत बायोमी टेकनॉलॉजीज प्रा. ली दर महिन्याला कृषी रसायने साक्षरता अभियान भरवते. या अभियानात राज्यभरातून विविध शेतकरी भाग घेतात. या अभियानामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी झाला आहे सध्या परिस्थिती पाहता महागड्या कृषी रसायनांचा व रासायनिक खतांचा अतिरेकी वापर त्यामुळे जमिनीचा कमी झालेला सेंद्रिय कर्ब आणि तसेच शेतीवर होणारा अमाप खर्च यामुळे अडचणीत आलेल्या शेतकरी बांधवांसाठी कृषी रसायनांच्या बाबतीत साक्षर होणे काळाची गरज आहे.

तसेच बायोमी शेतकऱ्यांना मातीबद्दल जागृत करण्याचे काम करते त्यामध्ये सोईलमीटरच्या साहाय्याने मातीतील जिवाणूंचे परीक्षण, जिवाणूंचा वापर रासायनिक बुरशीनाशकांचा जमिनीतून वापर कमी करण्यासाठी व माती जिवंत तर शेती जिवंत ठेवण्यासाठी चा उपाय योजना याबद्दल मार्गदर्शन दिले जाते व तसेच बायोमी सॉईलोमीटर या उत्पादनाच्या साहाय्याने शेतकरी बांधावरच आपल्या मातीतील जिवाणूची तपासणी करू शकतो.

शेतकऱ्यांचा वाढता उत्पादन खर्च, वातावरणातील अचानक बदलामुळे शेतकऱ्यांना येणाऱ्या समस्या, मातीची सुपीकता यासाठी बायोमीच्या संपर्कात आलो तिथून शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारच्या जैविक निविष्ठाही देणे शक्य झालं आणि शेतकऱ्यांना त्याचा कमी खर्चात उत्पादन घेणे शक्य झाले तसंच समस्यांचे निराकरण करण्यास मदत झाली.

आमचे एकच ध्येय शेतकऱ्यांसाठी खर्च कमी करणे व उत्पादनाचा दर्जा सुधारणे.

बायोमी टेकनॉलॉजीज प्रा. ली ची सर्व प्रकारची जैविक उत्पादने व सोईलोमीटर किट मिळण्याचे अहिल्यानगर जिल्ह्यातील ठिकाण केशर कृषी सेवा केंद्र, मार्केट यार्ड अहिल्यानगर.-८३०८२०६१६१

**आपल्या प्लॉटला व्हिजिट आणि मार्गदर्शनासाठी संपर्क -९५५९१९५००५**

# पारनेर मित्र परिवाराचा २० जुलै रोजी गुणगौरव सोहळा

नगर – पारनेर तालुक्यातील नगरमध्ये स्थायिक झालेल्या सभासदाच्या पाल्यांचा गुणगौरव सोहळा २० जुलै रोजी हमाल पंचायत भवन मार्केट यार्ड, अहिल्यानगर येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या गुणगौरव सोहळ्यासाठी पारनेर तालुक्यातील एस.एस.सी., एच.एस.सी.मध्ये विशेष प्राविण्य मिळविलेले तसेच एम.पी.एस.सी, यु.पी.एस.सी परिक्षेत अधिकारी पदावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार आयेजित केला असून पदवी कला, क्रिडा, व इतर क्षेत्रात नैपुण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित केला आहे. या शिवाय या कार्यक्रमासाठी आय.ए.एस.पदावर निवड झालेले ओंकार राजेंद्र खुंटाळे यांचे स्पर्धा परिक्षा विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले उपस्थित राहणार आहे.

या कार्यक्रमासाठी कुटूंबासह पाल्यांना घेऊन उपस्थित राहवे, असे आवाहन अध्यक्ष तारकराम झावरे, सचिव प्रा.किसनराव पायमोडे, उपाध्यक्ष सदानंद सोनवणे, कार्याध्यक्ष अर्कि.दत्तात्रय शेळके, आप्पासाहेब पानमंद, वसंत देशमुख, बाळासाहेब कोळी यांनी केले आहे.

# सी. जी. सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी हेमंत मिरीकर बिनविरोध



नगर – अहिल्यानगर एमआयडीसी मधील सी. जी. सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी हेमंत व्यंकटेश मिरीकर यांची बिनविरोध निवड झाली आहे. ही निवड सन २०२४-२५ ते २०२५ - २६ या कार्यकाळाकरीता असणार आहे.

३ जुलै रोजी पार पडलेल्या निवडणूक प्रक्रियेत प्राधिकृत निवडणूक अधिकारी विशाल अळकुटे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक पार पडली. निवडणुकीदरम्यान संस्थेचे वरिष्ठ कार्यालयीन सचिव जी. बी. फंड व सहसचिव संदीप रासकर यांनी निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविला.

सर्वानुमते व शांततेत पार पडलेल्या या निवडणुकीत हेमंत मिरीकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात संस्था नव्या उंचीवर पोहोचेल आणि प्रगतीस चालना मिळेल, असा विश्वास सर्व संचालक व सभासदांनी व्यक्त केला आहे.

# ओंकार आणि प्राजक्ता खाडिलकर यांना नादसरिता पुरस्कार प्रदान

नगर – श्रुती संगीत निकेतन या संस्थेच्या वतीने डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर आणि कीर्तीदेवी खरवंडीकर यांच्या पुण्यस्मृती निमित्त दिला जाणारा नादसरिता पुरस्कार यावर्षी पुणे येथील ओंकार आणि सौ.प्राजक्ता खाडिलकर यांना प्रदान करण्यात आला. अहिल्यानगर येथील साहित्यिक डॉ.अनिल सहस्रबुद्धे आणि सौ.उषा सहस्रबुद्धे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.



श्रुती संगीत निकेतन या संस्थेच्या वतीने दिला जाणारा नादसरिता पुरस्कार पुणे येथील ओंकार आणि सौ.प्राजक्ता खाडिलकर यांना प्रदान करण्यात आला.

ओंकार यांनी समर्पण या अतिशय रंगलेल्या मैफलीत दुर्गा राग, काही नाट्यपदे, त्यांच्या आई विदुषी आशाताई खाडिलकर यांनी संगीत दिलेली नवीन गीते सादर केली. प्राजक्ता खाडिलकर यांनी तराना आणि जयोस्तुते या गीतांवर आधारित कथ्थक नृत्य सादर केले. ही रंगलेली मैफल देखील रसिकांची विशेष दाद घेऊन गेली. या मैफलीला तबल्यावर हर्षद भावे, टाळावर किरण जोशी आणि हार्मोनियम वर मकरंद खरवंडीकर यांनी समर्पक साथसंगत केली. डॉ. ऋषिकेश कुलकर्णी यांनी निवेदन केले. डॉ.धनश्री खरवंडीकर यांनी प्रास्ताविक केले. स्नेहल उपाध्ये यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमात विविध संगीत परीक्षांमध्ये केंद्रात पहिले आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मेहेरमय संजीवन पॉलिएटिव्ह कॅन्सर केअर सेंटरचे महेश पवार यांचे आणि धनेश बोगावत यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी जयंत येलूलकर, अशोक गुर्जर, दिलीप जोशी, दिलीप अकोलकर, डॉ. हेमंत नाईक, सदानंद भणगे, सविता काळे, कुमुदिनी बोपर्डीकर, भूषण भणगे, राम तांबोळी, अभिजीत अपस्तंभ, अशोक गांधी, केतन क्षीरसागर आदि तसेच विद्यार्थी वृंद आणि रसिकउपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वेदांत कुलकर्णी, स्वराली जोशी, आर्या कुलकर्णी, वैष्णवी पटवा आदींनी परिश्रम घेतले.

# 'द पॅलेट'च्या वतीने चित्रकार प्राची थिगळे यांना आंतरराष्ट्रीय कांस्य पुरस्कार



नगर – 'द पॅलेट दिल्ली' या संस्थेच्या वतीने येथील चित्रकार सौ.प्राची थिगळे यांना 'आंतरराष्ट्रीय कांस्य पुरस्कार' जाहीर झाला आहे. या स्पर्धेचे परीक्षण इटलीच्या मेरी जिम्मत, फ्रान्सच्या रिची रॉन आणि कलाकार संदीप रावल यांनी केले. प्राची थिगळे यांच्या कला-सादरीकरणातील सर्जनशीलता, रंगसंगती आणि वैशिष्ट्यपूर्ण शैली याला आंतरराष्ट्रीय परीक्षकांनी मान्यता दिली.

प्राची थिगळे यांना यापूर्वीही 'समाजभूषण', 'भारतज्योती प्रतिभारत्न', 'आयडॉल लेडी' अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्या अहिल्यानगर व परिसरात आर्ट व क्राफ्ट कार्यशाळा घेतात. याशिवाय सामाजिक उपक्रमांमध्येही त्या सक्रिय सहभाग घेतात. त्यांची चित्रे केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या सीमेपलीकडेही पोहोचली असून, मुंबई, पुणे, जयपूर, दिल्ली यांसारख्या शहरांमध्ये त्यांच्या चित्रप्रदर्शनांना रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली आहे.

सध्या सौ.थिगळे 'प्राची क्रिएशन्स' या नावाने घरूनच पेंटिंग्स,मॉडेल्स, व इतर हँडमेड वस्तूंचा व्यवसाय यशस्वीपणे करत आहेत.

# शिष्यवृत्तीधारक गुणवत्ता यादीत आयुष पालवेचा १५१ वा क्रमांक



नगर – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) चा अंतीम निकाल व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या जाहीर करण्यात आला आहे.

अहिल्यानगर येथील कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूल या शाळेचा विद्यार्थी आयुष चंद्रकांत पालवे याने शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीत १५१ वे स्थान प्राप्त केले आहे.

आयुष पालवे याने यापूर्वी २०२२ मध्ये इ. ५ वी मध्ये असतांना पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले होते. त्याला सुनीता पाटील, शारोन मुंतोडे, सुषमा कांबळे, स्नेहल शिंदे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले असून त्याचे सर्व शिक्षकांनी तसेच संस्थेच्या मॅनेजर सिस्टर ॲन थेरेस, प्रिन्सिपल सिस्टर दिव्या मारिया तसेच सर्व नातेवाईक यांनी चि. आयुष याचे अभिनंदन व कौतुक केले आहे




आनंदऋषीजी योगा सेंटरमध्ये गुरुपौर्णिमा उत्सव योग साधकांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

# आनंदऋषीजी योगा सेंटरमध्ये गुरुपौर्णिमा उत्सव

नगर – अहिल्यानगर येथील श्री आनंदऋषी हॉस्पीटल, ब्लड बँक इमारत, स्टेशन रोड येथे गेली ३४ वर्षापासुन कार्यान्वित असलेले अनिल मेहेर संचलित आनंदऋषी योगा सेंटरमध्ये १० जुलै रोजी गुरुपौर्णिमेच्या दिवशी गुरुपुजनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास अहिल्यानगर येथील गुरुतुल्य व्यक्तीमत्व के. डी. खानदेशे वयाच्या ८० वर्षांत पर्दापण केलेले प्रमुख अतिथी म्हणून लाभले. तसेच अहिल्यानगर मधील हास्य सम्राट रमेश बोरा, सौ. सिना मुनोत, योग अभ्यासक सौ. लोमटे मॅडम यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती.

अनिल मेहेर यांचा सपत्नीक योग साधकाकडून ब्राम्हण हस्ते विधीपूर्वक, मंगलमय वातावरणात गुरु पूजन करण्यात आले.

या कार्यक्रमास योगा सेटरचे सर्व महिला साधक आणि पुरुष साधक योगा पोशाखात उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी आनंदऋषी योगा सेंटरचे श्री व सौ. राजेंद्रप्रसाद सिकची, श्री व सौ. दिलीप आशा गांधी, श्री व सौ. अशोक निता शहा, श्री व सौ. सतिष पडोळे, श्री व सौ.नवले, सौ. निता जाधव, ज्योती खताळ, सौ. सुनिता गुगळे, राजीव भळगट, चंदु शिंगी, उमेश बलदोटा, अनिल बडेरा, श्री व सौ. अनिल पोखरणा, श्री व सौ. अनिल धोत्रे आदी सर्व साधकांनी योगदान दिले.

# मंगल भक्त सेवा मंडळाकडून गुरुपौर्णिमा उत्साहात



मंगल भक्त सेवा मंडळाकडून गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

नगर – मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एफ ७०, एम.आय.डी.सी. अहिल्यानगर येथे १० जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सव निमित्त सकाळी श्रीं चा महाभिषेक, श्रीं चा पालखी सोहळा, श्रीं ची महाआरती तसेच पालखी मिरवणूक प्रसंगी गणांत ढोल पथकाने सादर केलेले वाद्यनृत्य यामुळे मठातील वातावरण भक्तीमय व भावपूर्ण बनले.

पालखी अगोदर, गुरूवर्य श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (श्री राजाभाऊ कोठारी) यांच्या वाणीतून गुरुपौर्णिमा अनुषंगाने आध्यात्मिक व सामाजिक सेवाकार्य विषयावर प्रवचन पार पडले. तदनंतर दर्शन सोहळासह महाप्रसाद सुरू झाला. सायंकाळी ७.३० ते रात्री १० या वेळेत ह.भ.प. नवनाथ महाराज म्हस्के, बाभळेश्वर (ता. राहता) यांचे त्यांच्या वीस सदस्यांच्या सहकार्याने श्री गुरूचरित्रावर आधारित तसेच सद्गुरू प्रती असणारे प्रेम, निष्ठा व गुरु-शिष्य यासंबंधी विविध दाखले देत किर्तन झाले. यानंतर मंगल भक्त सेवा मंडळाच्या वेबसाईटचे उदघाटन झाले. ही वेबसाईट तयार करण्याचे कार्य आपल्या परिवारातीलच छत्रपती संभाजीनगर येथील कु. गौरी कोळेकर हिने पार पाडले.

भक्तिमय वातावरणात सदगुरू श्री दत्त महाराज व श्री शंकर महाराज यांच्या कृपाशिर्वादाने व आदरणीय गुरुवर्य श्री विश्वेश्वर स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेतून अनेकांचा सन्मान करीत झाला.

# जीवनज्योत मेडिकल फाउंडेशनतर्फे करियर, रोजगार व स्वयंरोजगाराची संधी

नगर – जीवनज्योत मेडिकल फाउंडेशनव्दारा रोजगार - स्वयंरोजगारच्या सुवर्णसंधी देणारे विविध मेडिकल, नर्सिंग, पॅरामेडिकल, तांत्रिक आणि व्होकेशनल (व्यवसायिक) कोर्सेस संस्थेतुन चालविले जातात. ही संस्था भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालय, तसेच महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण मंडळ मुंबई व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणेशी मान्यताप्राप्त संलग्न आहे.

मानवी जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी आरोग्याबरोबरच ज्ञानाची जोड असली पाहिजे. जीवनज्योत मेडिकल फाउंडेशन ही संस्था शैक्षणिक, सामाजिक, व्यवसायिक आणि वैद्यकिय शोध संस्था आहे. ही संस्था वैद्यकिय सुविधा, शिक्षण, जनजागृतीसाठी उदयास आलेली आहे. तसेच स्वयंरोजगाराच्या संधी आणि मानवी राहणीमान उंचावण्यासाठी या संस्थेतून मिळू शकते.

वनविभाग ऑफीसमागे, नगर औरंगाबादरोड, अहमदनगर येथील बॉम्बे नर्सिंग होम इमारतीमध्ये कार्यालय आहे. मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा हे ध्येय ठेवुन सन १९९४ साली संस्थेची स्थापना झाली. तीन मजली सुसज्ज इमारतीमध्ये अत्याधुनिक शिक्षण पध्दतीव्दारे तज्ञ मार्गदर्शन वर्ग या संस्थेमध्ये उच्च विभूषित तसेच नावाजलेल्या व्यक्तींचा स्टाफ त्यामध्ये डॉक्टर्स, नर्सेस, समुपदेशक, पॅथोलोजिस्ट, तसेच शिक्षकांचा समावेश आहे. संस्थेमार्फत शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाची या पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे १००% नोकरीची संधी उपलब्ध आहे.

दहावी / बारावी व पदवीधर पास नापास मुलामुलींसाठी विविध कोर्सेस येथे चालवले जातात. दोन / एक वर्षात स्वकर्तृत्वावर उभे राहण्याची संधी व शासकीय नोकरीची पात्रता व संधी असलेले कोर्सेस येथे उपलब्ध आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे प्रमाणपत्र दिले जातात. प्रमाणपत्राची नोंद सेवा योजना कार्यालयास व रोजकार कार्यालय (एम्प्लॉयमेंट) मध्ये होते.

पॅरामेडिकल कोर्सेस, नर्सिंग क्षेत्रामधे ऑपरेशन थिएटर टेक्निशियन, नर्सिंग केअर, तसेच डिप्लोमा कोर्स इन फिजिओथेरापी, मेडिकल लॅब टेक्निशियन, रेडीओलॉजी टेक्निशियन, (एक्स रे / इ.सी.जी /सिटी स्कॅन/एम.आर.आय/सोनोग्राफी/ कॅथलॅब) डायलॅसिस, हेल्थ ॲण्ड सॅनिटरी इन्सपेक्टर, ऑप्टोमेट्री, ऑप्टीशियन (चष्म्याचे नंबर काढणे, चष्मे, काचा व फ्रेम बनविणे, कॉन्टॅक्ट लेन्सची माहिती व बसविणे) डेंटल मेकॅनिक टेक्निशियन (कृत्रिम दात व कवळी बनविणे, दुरुस्ती करणे), डेंटल हायजिनिस्ट टेक. (तोंडाच्या आजाराची माहिती व तोंडाची देखरेख करणे), डेंटल असिस्टंट व डायटीशन असिस्टंट इत्यादी कोर्सेसचा समावेश आहे.

व्यवसायिक/तांत्रिक कोर्सेसमध्ये ब्युटीपार्लर अँड हेअर ड्रेसिंग फायर अँड सेफ्टी मॅनेजमेट, बांधकाम पर्यवेक्षक स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (आय.टी.आय. समकक्ष), कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी व प्री प्रायमरी टिचर्स (बालवाडी / अंगणवाडी शिक्षिका) कोर्सेस चालविले जातात.

हे कोर्स उत्तीर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना स्वतःचा व्यवसाय करता येतो. शासकिय व खाजगी नोकरीची संधी. बांधकाम पर्यवेक्षक (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक) कोर्स उत्तीर्ण झाल्यावर जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, बी ॲण्ड सी व इतर विभागात शासकीय नोकरीची संधी उपलब्ध असुन पगार रु. ९३००-३४८०० ग्रेड पे रुपये ५६०० अशा प्रमाणात नेमणूक प्रक्रिया केली जाते. अशी माहीती प्राचार्यांनी दिली. अधिक माहीतीसाठी बॉम्बे नर्सिंग होम बिल्डींग, वनविभाग कार्यालयामागे, अहमदनगर येथे संपर्क साधावा. मो. ८८३०६८५७३२

उपरोक्त पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची १००% संधी.

On line admission साठी www.jjmf.info वर भेट द्या...

संस्थेत पॅरामेडिकल शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना सुसज्ज हॉस्पीटलमध्ये प्रत्यक्ष सराव करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते. संस्थेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अहमदनगर येथील मोठ्या हॉस्पीटलमध्ये कार्यरत असल्याचे संचालकांनी सांगितले.

सध्या वैद्यकिय व्यवसाय व आधुनिक तंत्रज्ञानामुळे पॅरामेडीकल (अर्धवैद्यकिय) व व्यावसायिक / तांत्रिक क्षेत्रात स्टाफची मागणी वाढलेली आहे. जीवन ज्योत ही संस्था शासन मान्यता प्राप्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होऊन त्यांचे राहणीमान उंचावले आहे.

विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीयुक्त सुसज्ज असे मुलींचे स्वतंत्र वसतीगृह आहे. लॅबोरेटरी अत्याधुनिक उपकरणांसह संलग्न हॉस्पीटल, वर्कशॉप, लॅबोरेटरी, ऑडीओ - व्हिडीओ लायब्ररी, कॉम्प्युटर / प्रोजेक्टरव्दारा प्रशिक्षण, मेस, एस. टी व रेल्वे पासची सुविधा, मोफत इंग्लिश स्पिकिंग व बेसिक कॉम्प्यूटर कोर्स, माफक शुल्क, हप्त्याने फी भरण्याची सोय, एज्युकेशन लोनच्या सुविधांचे मार्गदर्शन सहायता यासह रोजगार उपलब्धतेसाठी मार्गदर्शन केले जाते.

# प्रत्येक विद्यार्थ्यांनी गुणवत्ता वाढीसाठी अबॅकस शिकावे

## पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांचे प्रतिपादन; एव्हरेस्ट अबॅकस अॅकॅडमीची ३४ वी राष्ट्रीय अबॅकस स्पर्धा उत्साहात पार



एव्हरेस्ट अबॅकस अॅकॅडमीची ३४ वी राष्ट्रीय अबॅकस स्पर्धा उत्साहात पार पडली.

नगर – राष्ट्रीय शैक्षणिक धोरण संपूर्ण भारतामध्ये लागू करण्यात आले असून, या माध्यमातून देशाची शैक्षणिक गुणवत्ता निश्चितच उंचावणार आहे. अबॅकससारख्या गणित सोडवण्याच्या जलद पद्धतीतून विद्यार्थ्यांच्या गणिती कौशल्यामध्ये वाढ होणार आहे. कमीतकमी वेळेत गणिती आकडेमोड करताना व अचूक उत्तरे देताना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास मदत होत आहे. एव्हरेस्ट अबॅकस अॅकॅडमीचे कार्य जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचले पाहिजे व प्रत्येक विद्यार्थ्याने गुणवत्ता वाढीसाठी अबॅकस शिकले पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांनी केले.

एव्हरेस्टच्या वतीने ३४ व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी पोलीस उपअधीक्षक उगले बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून निबंधक छगन गंडाळ, शहर बँकेचे संचालक सुभाष गुंदेचा, पत्रकार अरुण वाघमोडे, सिनेअभिनेता बालकलाकार साईराज सरडे, स्वरा आकडकर, संस्थापक अशोक कार्ले, नायब तहसीलदार संध्या येणारे, डॉ. कल्पना घडेकर-कार्ले, उद्योजिका प्रिया मुनोत, अनिकेत गुंदेचा, अतुल सरडे आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचा शुभेच्छा संदेश उपस्थितां समोर प्रसारित करण्यात आला. स्वागत अण्णासाहेब शिंदे यांनी केले.

प्रास्ताविकात डॉ. कल्पना घडेकर यांनी नमूद केले की, गेल्या ४३ वर्षांपासून अॅकॅडमीने अबॅकसच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमधून घडवलेले आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात विविध मोठ्या पदांवर काम करताना हे विद्यार्थी अबॅकसचे आभार मानायला विसरत नाहीत, हीच आमची पुंजी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अबॅकस स्पर्धेमध्ये सुमारे १२०० विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी अबॅकसचे प्रात्यक्षिक सादर केले. वर्षभरामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अबॅकस शिक्षिका दिपाली वागस्कर, पुनम मुथा, वैशाली माने, कविता तरोटे यांना बेस्ट टीचर पुरस्कार तर पुनम मुथा यांना स्टार टीचर पुरस्कार व इतर शिक्षिकांना उत्कृष्टपणे अबॅकस शिकवणाऱ्या शिक्षिका पूनम लोंढे या गॅलेक्सी टीचर पुरस्काराच्या मानकरी ठरल्या.

कु.वैष्णवी वामन या विद्यार्थिनीला चॅम्पियन ऑफ चॅम्पियन हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर सुमारे ३०० विद्यार्थ्यांना विविध गटांमध्ये पारितोषिके प्रदान करण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमावर आधारित छावा हा चित्रपट दाखवण्यात आला. विद्यार्थ्यांनी पोवाडा, गीते, श्लोक पठण तसेच विविध अभिनयातून सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले.



फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेची गुणवत्ता यादीमध्ये श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी माध्यमिक विभाग येथील इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केल्याबद्दल संस्थेतर्फे गुणगौरव करण्यात आला. (छाया – उदय जोशी)

# शिष्यवृत्ती परीक्षेत 'समर्थ' प्रशालेचे यश

नगर – फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेची गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली. यामध्ये श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी माध्यमिक विभाग येथील इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. इयत्ता पाचवीच्या आयुष शिंदे, वेद कुलकर्णी, अन्विता पवार, कार्तिकी पालवे, प्रणिती म्हस्के, हर्षदा जाधव, श्रेया ब्राह्मणकार, कमल सानप, अजिंक्य गवळी हे ९ विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरलेले आहेत तर इयत्ता आठवीचे सार्थक पालवे व युवराज तांदळे हे २ विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरले आहेत. विद्यार्थ्यांचा संस्थेतर्फे पेढे व पुष्पगुच्छ देऊन गुणगौरव करण्यात आला.

माध्यमिक विभाग शालेय समिती चेअरमन सावेडी अॅड.किशोर देशपांडे, प्रशालेच्या प्राचार्या तथा मुख्याध्यापिका श्रीमती संगीता जोशी, पर्यवेक्षक सुनील कानडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

इयत्ता आठवी शिष्यवृत्ती मार्गदर्शन करणारे एल. एम.कुलकर्णी, सौ. अनुराधा शास्त्री, भोराजी पथवे तर इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत मार्गदर्शन करणारे श्रीमती प्रियंका कासार, संकेत शिंदे, श्रीमती चैताली गोरे, सौ. कीर्ती वाघमारे आदी शिक्षकांनी मार्गदर्शन केले.



सावता परिषदेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी प्रविण जाधव यांची निवड करण्यात आली.

# सावता परिषदेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी प्रविण जाधव यांची निवड



नगर – सावता परिषदेच्या अहिल्यानगर महानगर जिल्हाध्यक्षपदी प्रविण जाधव यांची संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली निवड करण्यात आली आहे. बिड येथे १३ जुलै रोजी पार पडलेल्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत ही निवड अधिकृतपणे जाहीर करण्यात आली. या बैठकीला संपूर्ण महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी उपस्थित होते.

प्रविण जाधव हे सात वर्षा पासुन संघटना बळकट करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे जिल्हास्तरावर सावता परिषदेचे कार्य अधिक प्रभावीपणे राबवले जाईल, असा विश्वास प्रदेश प्रभारी मयूर वैद्य, प्रदेश अध्यक्ष गणेश दळवी, प्रधान महासचिव राजीव काळे, प्रदेश अध्यक्ष युवक आघाडी प्रवीण गाडेकर, प्रदेश कार्याध्यक्ष संतोष राजगुरु, जिल्हा अध्यक्ष निखिल शेलार आदींनी व्यक्त केला.

निवडीनंतर प्रवीण जाधव यांचे फुलांचा हार व सत्कार करून स्वागत करण्यात आले.

# युथ वॉरियर कप स्पर्धेत 'अचिव्हर्स अॅकॅडमी' ठरली प्रथम क्रमांकाच्या ट्रॉफीची मानकरी



पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये युथ वॉरियर कप स्पर्धेत अचिव्हर्स स्पोर्टस् अॅकॅडमी प्रथम क्रमांकाच्या ट्रॉफीची मानकरी ठरली.

नगर – नुकत्याच पुणे येरवडा येथे झालेल्या युथ वॉरियर कप निमंत्रित राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये अचिव्हर्स स्पोर्ट्स अकॅडमीच्या ३६ खेळाडूंनी सहभाग नोंदाविला असून स्पर्धेत सर्वच खेळाडूंनी अनेक पदकांची लयलूट केली. कराटे स्पर्धेमध्ये कुमीते व काता या दोन प्रकारात प्राविण्य प्राप्त खेळाडू (मुली)– श्रुती भैस –सुवर्ण व रौप्य, सना शेख –२ रौप्य, जोया शेख – रौप्य, स्वामीनी सोनावणे – रौप्य, जिया पटेल – सुवर्ण व कांस्य, सान्वी साळुंके रौप्य व कांस्य, इरा साळुंके सुवर्ण व कांस्य, ग्रेसि वाघमारे–कांस्य, सांची शेणवी –२ रौप्य, हरिप्रिया भोरे– रौप्य, वैष्णवी कुटे– सुवर्ण, स्वरा कुरटे–सुवर्ण व रौप्य, खुशी कुरटे–रौप्य, आरोही अचारी–रौप्य, यशश्री बांगर– सुवर्ण पदक,

(मुले)– अरमान शेख –कांस्य, नन्हे ओंकार– रौप्य, अथर्व जाधव–सुवर्ण, प्रणव दराडे–सुवर्ण व कांस्य, रुद्रप्रताप मुळे–कांस्य, रेहान पटेल–सुवर्ण, राजवीर सारवान–कांस्य, तैमूर सय्यद–सुवर्ण, रोहन दुशिंग –२ रौप्य, साई आचारी–रौप्य, आदेश चव्हाण–कांस्य व रौप्य, स्वराज लिमन–२ रौप्य, ऋषिकेश खेडकर सुवर्ण, मयंक पवार सुवर्ण व रौप्य, समर्थ सूर्यवंशी –सुवर्ण, आदित्य पुजारी–कांस्य, अविनाश गोल्हार–सुवर्ण व कांस्य, आरव टकले–२ कांस्य, प्रदीप होडग–कांस्य, मृत्युंजय शिंदे–कांस्य, नबील पटेल–रौप्य या खेळाडूंनी पदके मिळवून अहिल्यानगर शहराचे नाव सर्वत्र मोठे केले आहे.

खेळाडूंना अचिव्हर्स स्पोर्ट्स अकॅडमीचे (संस्थापक) तसेच मुख्य प्रशिक्षक सेन्सेई आदित्य क्षीरसागर व अॅकॅडमीचे काही पदाधिकारी व पंच म्हणून उत्तम कामगिरी करणारे प्रशिक्षक आशिष केदारी, सोनिया कातोरे, कुशल मेस्त्री, अदिती होले, कृतीशा बोर्डे या सर्व प्रशिकांचे मार्गदर्शन लाभले आहे.



रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचा पदग्रहण सोहळ्याचे दीपप्रज्वलन करताना पदाधिकारी.

# रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचा पदग्रहण सोहळा उत्साहात

नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचा २०२५–२६ या वर्षासाठीचा पदग्रहण सोहळा झाला असून सुनील कटारिया यांनी अध्यक्षपदाची तर सचिव पदाची सूत्रे अमर गुरप यांनी स्वीकारली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्रांतपाल रवी धोत्रे व असिस्टंट गव्हर्नर मधुरा झावरे यांच्या हस्ते व जीवन ज्योति ट्रस्टचे संचालक हरकचंद सावला यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

यावेळी हितेश गुप्ता, गिरीश मुळे, डॉ. दिलीप बागल, सतीश कटारिया, डॉ. किर्ती कोल्हे, केतन मुथा, विनोद बोरा, अलनूरभाई, राजीवभाई गुजर, अजय मुथा, अभिजित कोठारी, चेतन अमरापूरकर, दत्ता दीक्षित, नितीन मुथा, नरेंद्र चोरडिया, मधुबाला चोरडिया, मीनल बोरा, निलेश शहा, जिग्नेश पटेल, महेश गुंदेचा, आदित्य गांधी, उमेश रेखे, विठ्ठल लांडगे, चंद्रकांत मेहेत्रे, संजय पिपाडा, विजय जुंद्रे, मनोज चंगेडिया, राजेश परदेशी, निवृती झिने, शिरीष रायते, प्रमोद पारीख, क्षितिज झावरे, मेजर डोनर व संस्थापक सदस्य डॉ. श्रीकृष्ण जोशी, सागर जाधव तसेच शहरातील विविध क्लब अध्यक्ष सेक्रेटरी, डिस्ट्रिक्ट डायरेक्टर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात स्वरा खाजगीवाले हिच्या सुरेल सादरीकरणाने मंत्रमुग्ध करणारी ठरली. दरम्यान क्लबच्या २०२५–२६ या वर्षातील प्रथम बुलेटिन 'सेंट्रल पोस्ट' चा प्रकाशन सोहळा पार पडला.

सुनील कटारिया म्हणाले, पदग्रहण ही जबाबदारीची सुरुवात असून, क्लबच्या सर्व सदस्यांच्या सहकार्याने अधिकाधिक समाजोपयोगी व प्रभावी उपक्रम राबवण्याचा आमचा संकल्प आहे, तसेच सेवन एरिया फोकस मधील सर्व उपक्रम योग्य पद्धतीने पूर्ण करून समाजहित, जनहित आणि क्लबच देखील नाव उंचावर नेण्याचं प्रभावी काम आम्ही सर्वांची मदतीनं करू असे ते म्हणाले

कार्यक्रमाच्या यशासाठी IPP डॉ. कुणाल कोल्हे, क्लब लर्निंग फॅसिलिटेटर, मनीष बोरा, ईश्वर बोरा, डायरेक्टर पब्लिक इमेज प्रसन्ना खाजगीवाले, डायरेक्टर मेडिकल डॉ. श्रेया खाजगीवाले, बुलेटिन एडिटर सुजाता कटारिया व क्लबमधील रोटेरियन्स यांचे योगदान मोलाचे ठरले.

# तुमचं आमचं नातं काय हे रोटरी शिकवते

## रो. जयेशभाई पटेल यांचे प्रतिपादन; रोटरी इंटिग्रिटीचा पदग्रहण सोहळा उत्साहात,अध्यक्ष शुभश्री पटनायक, सचिव निखिल कुलकर्णी



स्नेहालय येथे रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीचा पदग्रहण सोहळा रोटरी क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. जयशभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. (छाया – समीर मन्यार)

नगर – समाजकार्य करण्यासाठी गोरगरिबांच्या मदतीसाठी रोटरी कार्य करते. दिशा ठरवायची असते वाट आपोआप मिळते. रोटरी ही ठरवलेली दिशा आहे. रोटरीची कार्य करण्याची एक वेगळी पद्धत आहे. ठरवलेल्या दिशेनुसार काम करा मार्ग आपोआप मिळतो. वेगवेगळ्या विचारांचे लोक एकत्र येऊन येथे समाजासाठी काम करतात. तुमचं आमचं नातं काय हे रोटरी शिकवते, असे प्रतिपादन रोटरी क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर जयेशभाई पटेल यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीच्या स्नेहालय येथे आयोजित नूतन अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव यांच्या पदग्रहण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी क्लबचे मावळते अध्यक्ष रो. डॉ. राजीव चिटगोपेकर, सचिव निखिल कुलकर्णी, रो. चंदना –शहा गांधी, रवी डीक्रूज, उदयभानसिंग परदेशी, मंगुली नायक, अमित धोकरिया, उमेश कोदे, प्रियांका चिखले, स्नेहालयाचे राजेंद्र शुक्रे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री. पटेल म्हणाले की अध्यात्मात मोठी ताकद आहे. विठ्ठलवारी आणि रोटरी हा संदर्भ ठेवून भजनाच्या गायनाने कार्यक्रमाची सुरुवात केली. त्या माध्यमातून भारतीय संस्कृती जोपासण्याचं काम इंटिग्रिटी क्लबने केले आहे. याचा आदर्श आपण सर्वांनी घ्यायला हवा. जसं वारकऱ्यांना विठ्ठल वारीला जाऊन विठ्ठल भेटीचा आनंद मिळतो तसाच आनंद रोटरी मध्ये राहून गोरगरिबांची सेवा करून समाजाची सेवा करून मिळत असल्याचे म्हणत रोटरी क्लबऑफ इंटिग्रिटीने केलेल्या कामाचे कौतुक यावेळी त्यांनी केले.


मावळते अध्यक्ष डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीच्या माध्यमातून गतवर्षी केलेल्या सामाजिक उपक्रमाची सविस्तर माहिती दिली.

नूतन अध्यक्ष रो. पूजा पटनायक व सचिव निखिल कुलकर्णी यांनी सांगितले की रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीने पुढील वर्षाच्या एकूण ३६ सामाजिक प्रोजेक्टची तयारी करून ठेवली असून. हे प्रोजेक्ट शहरातील सर्व रोटरी क्लब ला बरोबर घेऊन राबविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी क्लबच्या वतीने स्नेहालयातील विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करून डोळ्यांच्या आरोग्या विषयी घ्यावयाची काळजी यावर डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच याप्रसंगी क्लबच्या वतीने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

सूत्रसंचालन चंदना–शहा गांधी यांनी केले तर सचिव निखिल कुलकर्णी यांनी आभार मानले.

# बी. ए. एलएल. बी. परिक्षेत वैदेही रासने प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



नगर – येथील वैदेही रासने हिने कायद्याच्या क्षेत्रात पुण्यातील मॉडर्न लॉ कॉलेज येथून पाच वर्षांचा बी.ए. एलएल.बी. पदवी अभ्यासक्रम प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली. तिचे वडील रवि अशोक रासने हे सुरभि कलेक्शन (मोबाइल व कम्प्युटर अॅक्सेसरीज) या व्यवसायाच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर कार्यरत आहेत. आपल्या शिक्षणप्रवासात वैदेहीने नेहमीच अभ्यासात सातत्य राखले, तसेच शाळा आणि महाविद्यालयीन जीवनात विविध सामाजिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घेतला.

आपले मनोगत व्यक्त करताना वैदेही हिने सांगितले की, या यशामागे माझे आईवडील, मार्गदर्शक प्राध्यापक, माझ्या अभ्यासात सातत्याने पाठिंबा देणारे मित्रमैत्रिणी आणि माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाचे मोलाचे योगदान आहे. मी सर्वांची मनापासून आभारी आहे. भविष्यात मास्टर ऑफ लॉ आणि पीएच. डी. करण्याची तिची इच्छा असून, कायद्याच्या क्षेत्रात काम करताना गरजूंसाठी आणि स्त्रियांच्या प्रश्नांसाठी न्याय मिळवून देण्यासाठी कार्य करायचे आहे, असे तिचे मत आहे.

# शिक्षण केवळ पदवी मिळवण्यासाठी नाही तर समाज घडवण्यासाठी असते

## हाजी खानसाहब यांचे प्रतिपादन; मुकुंदनगर ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा



मुकुंदनगर ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा झाला. याप्रसंगी उपस्थित असलेले पदाधिकारी.

नगर – आजचा दिवस हा केवळ यशाचा उत्सव नाही, तर परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीला मिळालेल्या सन्मानाचा दिवस आहे. तुम्ही केवळ गुण मिळवलेले नाहीत, तर समाजासमोर एक आदर्श ठेवलाय की कष्ट, संयम आणि सातत्य या गोष्टींचा मिलाफ असला की कोणतीही परीक्षा कठीण राहत नाही. तुमचं हे यश तुमच्या आई–वडिलांचं, शिक्षकांचं आणि सर्वच मार्गदर्शकांचंही यश आहे. त्यांचा हात आणि आशीर्वाद कायम तुमच्यासोबत आहे. शिक्षण केवळ पदवी मिळवण्यासाठी नाही, तर समाज घडवण्यासाठी असते, असे प्रतिपादन ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष हाजी खानसाहब शेख सर यांनी केले.

मुकुंदनगर येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने दहावी, बारावी, सीए, वकील, डॉक्टर व इतर व्यवसायीक कोर्सेस मध्ये प्रथम दर्जामध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा एन.एम. गार्डन मुकुंदनगर येथे पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आयटीआयचे प्रचार्य खालीद जहागीरदार, माजी प्रचार्य नवेद बिजापुरे, नोटरी पब्लिक अॅडवोकेट हाफीज जहागीरदार, नगरसेवक आसिफ सुलतान, निजाम जहागीरदार मखदुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद खान, माजी नगरसेविका नसीम खान, अल करम हॉस्पिटलचे डॉ. जहीर मुजावर, डॉ. सईद शेख, आर्किटेक्ट अर्शद शेख, डॉ.परवेज अशरफी, जाहिद सय्यद, जहीर सय्यद, मुख्याध्यापक मुन्नवर हुसेन, अफजल आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सामुदायिक संविधान वाचनाने करण्यात आली. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा शाल पुष्प व समृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष हाजी खान साहब शेख सर हे होते.

पुढे बोलताना शेख सर म्हणाले की तुम्ही आज ज्या यशाचं गमक उचललं आहे, त्याचा उपयोग समाजोपयोगी कार्यासाठी केला, तर तुम्हाला खरा आनंद मिळेल. प्रत्येक यशस्वी विद्यार्थी हा भविष्यातील डॉक्टर, वकील, चार्टर्ड अकाउंटंट, इंजिनियर, शिक्षक अशा विविध भूमिका पार पाडणार असतो. पण त्याहीपेक्षा तो एक चांगला नागरिक, संवेदनशील माणूस म्हणून घडला पाहिजे. हीच खरी तुमच्या पासुन अपेक्षा आहे. उद्याचे भारत हे तुमच्या खांद्यावर उभे राहील. आणि त्याला उज्वल करण्याची ताकद तुमच्यात आहे असे नमूद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हाजी खानसाहब, उपाध्यक्ष हाजी रऊफ मोहम्मद शेख बिल्डर, कार्याध्यक्ष अल्हाज आलम खान, सचिव बशीर पठाण, सहसचिव शेख फकीर मोहम्मद, खजिनदार इस्माईल पठाण, सदस्य हाजी शेख बिलाल, कादिर सर, शेख अब्दुल रहीम, गोटू जहागीरदार, इब्राहिम पठाण, मिर्झा नवेद अंजुम, शेख हबीब पेंटर, सय्यद इकबाल, अॅड. सय्यद मो.अन्वर, हाजी सय्यद अब्दुल अजीज, शेख गुलाम दस्तगीर, शेख इस्माईल, हाजी शेख अब्दुल सईद, सय्यद आरिफ, हाजी शेख शरफुद्दीन, पठाण हबीब, सय्यद नुर मोहम्मद, अॅड.ताज आश्रफ आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच समाजात सामाजिक काम करणारे कार्यकर्ते व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईस्माईल शेख व हाजी शरफुद्दीन सर यांनी केले. रऊफ बिल्डर यांनी आभार मानले.

# कॉर्न आलू मसाला चाट



झटपट रेसिपी

एखाद्या निवांत संध्याकाळी मित्रमंडळींसोबत गप्पांचा फड जमवताना काहीतरी चटपटीत खावंसं वाटतं. एखाद्या चाट पदार्थामुळे तोंडाला छान चव येते. अशावेळी झटपट तयार होणारी कॉर्न आलू मसाला चाट ही रेसिपी तुम्ही ट्राय करू शकता.

**सामग्री :** एक कप उकडलेले स्वीट कॉर्न, उकडलेल्या बटाट्याचे काप एक कप, दोन टोमॅटो, एक टेबलस्पून आल्याची पेस्ट, अर्धा टेबलस्पून हळद, प्रत्येकी एक टेबलस्पून जिरेपूड, धनेपूड आणि लाल तिखट, मॅगी मसाल्याचं एक पाकीट, चिमूटभर हिंग, दोन हिरव्या मिरच्या, अर्ध लिंबू, चिरलेली कोथिंबिर, तीन चमचे तेल, चवीनुसार मीठ

**कृती :** टोमॅटो आणि हिरवी मिरची बारीक चिरून घ्या. एका कढईत तेल घाला. गरम झाल्यावर त्यात जिरेपूड घालून मंद आचेवर परतून घ्या. आता त्यात हिंग, आल्याची पेस्ट, हिरवी मिरची घालून परता. यानंतर टोमॅटो, हळद, धनेपूड, लाल तिखट आणि चवीनुसार मीठ घाला. टोमॅटो नीट शिजवून घ्या. टोमॅटो मऊ शिजल्यावर त्यात स्वीट कॉर्न आणि बटाटे घालून हलवून घ्या. कढई झाकून ठेवा. पाच मिनिटांनंतर मध्यम आचेवर कॉर्न-बटाट्याचं मिश्रण परतून घ्या. मग त्यात मॅगी मसाला घालून हलवून घ्या. गॅस बंद करून लिंबाचा रस आणि कोथिंबिर घाला. कॉर्न आलू चाट तयार आहे. त्यावर शेव आणि कांदा घालून खाता येईल.




# संन्यास सोडून उभारला उद्योग

अचिव्हर



शोभित कुमार सिंह यांची कहाणी फारच प्रेरणादायक आहे. त्यांनी आयुष्यात अनेक चढ-उतारांचा सामना केला. एकेकाळी संन्यास घेण्यासाठी निघालेले शोभित आज एक यशस्वी उद्योजक आहेत. कानपूरचे रहिवासी असलेले शोभित जवळपास दीड वर्ष आश्रमात सन्यांसी म्हणून राहत होते. मात्र आई-वडिलांच्या दबावामुळे त्यांना पुन्हा घरी यावे लागले. त्यानंतर शोभित यांनी लग्न केले. आज शोभित १२० कोटी रुपयांचा टर्नओव्हर असलेल्या खेळणी आणि स्टेशनरी ब्रँडचे मालक आहेत.

शोभित कुमार सिंह उत्तर प्रदेशातील कानपूर येथील रहिवासी आहेत. त्यांचा जन्म एका धार्मिक कुटुंबात झाला असून त्यांनी १९९७ मध्ये अलीगढ मुस्लिम युनिव्हर्सिटीमधून इकॉनॉमिक्समध्ये बीए ऑनर्स केले होते. १९९९ मध्ये त्यांनी फायनान्समध्ये एमबीए केले. त्यांनी दिल्लीत एका जर्मन सॉफ्टवेअर कंपनीत पहिली नोकरी केली. तिथे त्यांनी असिस्टंट मॅनेजर म्हणून काम केले. सुरुवातीपासूनच त्यांचे मन अध्यात्माकडे झुकलेले होते. त्यांनी विविध धर्मांचा अभ्यास केला. त्यात वैदिक व्यवस्थापन कार्यक्रम, इस्लामिक शिकवणी आणि ख्रिश्चन धर्मशास्त्र यांचा समावेश आहे.

एमबीए आणि नंतर जर्मन सॉफ्टवेअर फर्ममध्ये करिअर सुरू केल्यानंतर वयाच्या २६ व्या वर्षी शोभित यांनी भौतिक सुखाचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. ते ऋषिकेश येथे महर्षी महेश योगी यांच्या आश्रमात सन्यासी म्हणून राहू लागले. तिथे त्यांनी जवळपास १८ महिने वास्तव्य केले. साधारण दीड वर्षांनंतर आई-वडिलांच्या दबावानंतर त्यांनी सन्यांसी आयुष्य सोडून लग्न केले. त्यांची पत्नी बडोद्यातील एका व्यावसायिक कुटुंबातील होती. त्यामुळेच त्यांनी व्यवसायात पाऊल ठेवले.

शोभित कुमार सिंह यांनी २०१६ मध्ये 'स्टोन सफायर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' ही कंपनी सुरू केली. कंपनीने त्यांच्या ब्रँडअंतर्गत लहान मुलांची खेळणी आणि स्टेशनरीचे मार्केटिंग सुरू केले. त्यांनी 'स्टोन सफायर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड'ला एक अग्रगण्य मेक इन इंडिया स्टेशनरी आणि खेळण्यांचा ब्रँड बनवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. त्यांच्या कंपनीचा टर्नओव्हर १२० कोटींचा आहे. त्यांनी मुलांसाठी 'आर्ट अँड कल्चर किट'ची देखील सुरुवात केली होती. त्यानंतर स्टेशनरी, खेळणी, गेम्स आणि होम प्रॉडक्ट्सच्या उत्पादनाला सुरुवात केली. शोभित यांच्याकडे ५००हून अधिक एसकेयू (स्टॉक-कीपिंग यूनिट्स) आहेत. त्यांनी प्ले-डॉ, माय लिटिल पोनी, प्लेस्कूल, बार्बी, हॉट व्हिल्स, मार्व्हल, फ्रिशर-प्राइस, डिज्नी सारख्या प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय ब्रँडसाठी खेळण्यांच्या उत्पादनाचे लायसन्स मिळवले आहे.

कंपनीकडे संपूर्ण भारतात वितरण नेटवर्क आहे. तीस हजारांहून अधिक दुकानात त्यांचा माल जातो.


## शेर की जुबानी

इन अजनबी सी राहों में,
जो तू मेरा हमसफर हो जाए,
बित जाए पल भर में ये वक्त,
और हसीन सफर हो जाए।

मैं चुप कराता हूं, हर
शब उमडती बारिश को,
मगर ये रोज, गई बात
छेड देती है।

राज खोल देते हैं नाजुक
से इशारे अक्सर, कितनी
खामोश मोहब्बत की
जुबान होती है।


## टेक टॉक



### इंजिन गरम होतेय?

ट्रॅफिकमध्ये थांबल्यामुळे किंवा सतत रायडिंग केल्यामुळे बाईकचे इंजिन ओव्हरहीट होऊ लागले तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. कारण बाइकचे इंजिन खराब होऊ शकते किंवा मायलेज कमी होऊ शकते. अतिवेगाने वाहन चालवणे टाळले पाहिजे. अतिवेगाने वाहन चालवल्यावर बाइकच्या इंजिनचे नुकसान होते. इतकेच नाही तर बाईकचे इंजिन वेगाने गरम होते आणि मायलेज झपाट्याने कमी होते. बाइकमध्ये कधीही ट्रिपलिंग करू नका कारण असे केल्याने बाइकच्या इंजिनवर प्रचंड ताण येतो आणि मग बाईकचे इंजिन ओव्हरहीट होऊ लागते. इंजिन जास्त गरम झाल्याने आग लागू शकते. अशावेळी इंजिन ऑईल आणि कूलंट लेव्हलची काळजी घेणे गरजेचे आहे. कमी कूलंटमुळे इंजिन जास्त गरम होऊ शकते. जास्त उष्णतेमुळे जवळच्या इंधन किंवा तेलाच्या पाईपमध्ये आग लागू शकते. कूलंटमुळे इंजिन थंड राहते. इंजिन ऑईलची पातळीही योग्य असावी. इंजिन ऑईल किंवा ट्रान्समिशन फ्लुइडची गळती तपासा. उन्हाळ्यात नेहमी बाईक सावलीत पार्क करण्याचा प्रयत्न करा.


## जाणून घ्या




### इंटरनेटशिवाय पैसे कसे पाठवाल?

इंटरनेट नसताना पैसे पाठवायचे असतील तर सर्वप्रथम *९९ टाइप करा आणि कॉल करा. यानंतर तुम्हाला भाषा निवडण्याचा पर्याय मिळेल. भाषा निवडल्यानंतर १ डायल करा. यानंतर ज्या यूपीआय आयडीवर तुम्हाला पैसे पाठवायचे आहेत ती माहिती भरा. यानंतर 'यूपीआय' पिन टाकण्यास सांगितले जाईल. पिन व्हेरीफाय झाल्यानंतर तुम्ही समोरच्या व्यक्तीला पैसे पाठवू शकाल. या सेवेद्वारे तुम्ही फक्त ५००० रुपयांपर्यंत ट्रान्सफर करू शकता. *९९ ला कॉल करून तुम्ही तुमचा 'यूपीआय' पिन बदलू शकता. मोबाईलच्या डायलरमध्ये *९९ कोड टाका आणि कॉल करा. यानंतर भाषा निवडा. यानंतर सेट यूपीआय पीनचा पर्याय निवडा. हा पर्याय ५ व्या क्रमांकावर मिळू शकेल. यानंतर अकाउंट नंबरचे शेवटचे ६ अंक आणि डेबिट कार्डची एक्सपायरी डेट टाका. यानंतर मोबाइल नंबरवर एक ओटीपी पाठवला जाईल. तो ओटीपी टाका. यानंतर तुम्हाला यूपीआय पिन सेट करण्यास सांगितले जाईल.


## ॲप वर्ल्ड




### वायफाय ट्रॅकिंग धोकादायक?

'ॲपल'च्या मते 'वायफाय ट्रॅकिंग' हे फीचर चांगली नेटवर्क कनेक्टिव्हिटी आणि लोकेशन-आधारित सेवा देते. परंतु याचा तुमच्या गोपनीयतेवर आणि फोन बॅटरीवर वाईट परिणाम होतो. वायफाय ट्रॅकिंगमुळे लोकेशन लीक होण्याचा धोका वाढतो. तुमचा डेटा तुमच्या संमतीशिवाय शेअर केला जाऊ शकतो. बॅटरी जलद संपते. कारण फोन सतत नेटवर्क स्कॅन करतो. काही 'थर्ड पार्टी ॲप्स' या डेटाचा गैरवापर करू शकतात. ट्रॅकिंगमुळे तुमचा फोन सायबर हल्ल्याला बळी पडू शकतो. वायफाय ट्रॅकिंग बंद करणे खूप सोपे आहे. त्यासाठी फक्त पुढील काही गोष्टी कराव्या लागतात. १. आयफोनच्या सेटिंग्जमध्ये जा २. खाली स्क्रोल करा आणि गोपनीयता आणि सुरक्षावर टॅप करा ३. नंतर लोकेशन सर्व्हिसेस पर्यायावर जा ४. तळाशी सिस्टम सर्व्हिसेस निवडा. येथे तुम्हाला नेटवर्किंग आणि वायरलेसचा पर्याय दिसेल ६. त्यावर क्लिक करा आणि टॉगल करा. कृपया हे लक्षात ठेवा ही सेटिंग बंद केल्याने तुमचा आयफोन वायफायशी कनेक्ट होण्यापासून थांबणार नाही. फरक एवढाच असेल, की आता तुमचे लोकेशन वायफाय नेटवर्कद्वारे ट्रॅक केले जाणार नाही.

# लग्न ठरत नाही...




मॅच मेकिंग

मी २९ वर्षांचा तरुण असून बँकेत चांगल्या पदावर नोकरी करतो. मी दिसायला चारचौघांसारखाच आहे. गेल्या वर्षभरापासून माझ्यासाठी वधूसंशोधन सुरू आहे. पालकांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. सर्वतोपरी प्रयत्न करूनही माझं लग्न ठरत नाही. आम्ही वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती दिल्या आहेत. विविध मॅट्रिमोनिअल साईट्सवरही नाव नोंदवलं आहे. कधी पत्रिका जुळत नाहीत तर कधी स्वभाव न जुळल्यामुळे बोलणी फिस्कटतात. मी एका सुशिक्षित, पुढारलेल्या कुटुंबातला मुलगा आहे. आर्थिकदृष्ट्याही स्थिरस्थावर आहे. त्यामुळे आता लग्न करायचं आहे. पण लग्न ठरण्यात येणाऱ्या अडचणींमुळे मी खूप अस्वस्थ आहे. अनेकदा मला खूप निराश वाटतं आणि मी नियतीला दोष देत बसतो. माझ्यावर मनापासून प्रेम करणारी मुलगी कधीच मिळणार नाही, असं आता वाटू लागलं आहे. मी काय करू?

**उत्तर** : सुयोग्य जोडीदार कधी मिळेल, हे कोणीच ठामपणे सांगू शकणार नाही. सद्यपरिस्थितीत तू स्वत:ला वेळ दे. स्वविकास करण्याचा प्रयत्न कर. व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी असणं आणि सुशिक्षित, पुढारलेल्या कुटुंबाचा भाग असणं या तुझ्या जमेच्या बाजू आहेत. सततच्या अपयशामुळे खचणं, नैराश्य येणं स्वाभाविक आहे. यातून बाहेर पडण्यासाठी समुपदेशकांची मदत घेता येईल. सोशल मीडियाच्या माध्यमातून तू समविचारी लोकांशी संवाद साध. नव्या लोकांना भेटण्यासाठी काही ग्रुप्समध्ये सहभागी हो. लग्न ही जन्मभराची कमिटमेंट आहे. गोष्टी जुळून यायला वेळ लागतो. तू धीर सोडू नकोस. मुख्य म्हणजे उतावळेपणाने कोणताही निर्णय घेऊ नकोस. तुला मनासारखा जोडीदार नक्कीच मिळेल.

# जगातील दुसऱ्या क्रमांकाची भिंत



भटकंती

जगातील सर्वात लांब भिंत म्हटले, की चीनमधील 'द ग्रेट वॉल' आठवते, परंतु जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात लांब भिंत आपल्या भारतातच आहे हे अनेकांना आजवर ठाऊक नाही. ही भिंत शतकानुशतके शत्रूंपासून संपूर्ण राज्याचे रक्षण करते आहे.

राजस्थानमधील कुंभलगड किल्ल्यात जगातील दुसरी सर्वात लांब भिंत आहे. हा फक्त एक किल्ला नाही, तर शौर्य, कला आणि इतिहासाचा जिवंत पुरावा आहे. तो अजूनही अरवली टेकड्यांमध्ये अभिमानाने उभा आहे.

**भारताची 'ग्रेट वॉल'**

उदयपूरपासून सुमारे ८४ किलोमीटर अंतरावर असलेल्या अरवलीच्या टेकड्यांमध्ये असलेला हा किल्ला घनदाट जंगलांनी वेढलेला आहे. १५ व्या शतकात महाराणा कुंभ यांनी हा किल्ला बांधला होता. त्यांनी कोणताही बाह्य आक्रमणकर्ता सहज प्रवेश करू शकणार नाही, अशा प्रकारे हा किल्ला बांधला होता. यामुळेच कुंभलगडच्या सुरक्षा भिंती इतक्या मजबूत आणि रुंद बनवल्या गेल्या, की त्याला 'भारताची ग्रेट वॉल' म्हणून ओळखले जाऊ लागले.

**३६ किलोमीटर लांबीची भिंत**

या किल्ल्याची भिंत सुमारे ३६ किलोमीटर लांबीची आहे. ती चीनच्या 'ग्रेट वॉल' नंतर जगातील दुसरी सर्वात लांब भिंत आहे. ती इतकी रुंद आहे, की आठ घोडे एकत्र धावू शकतात. या किल्ल्याची मजबूती आणि रचना पाहता कोणत्याही शत्रूला तो जिंकणे सोपे नव्हते, याचा अंदाज लावता येतो.

कुंभलगड येथे शूर योद्धा, महाराणा प्रताप यांचा जन्म झाला. त्यांनी कधीही मुगलांकडून पराभव स्वीकारला नाही. म्हणूनच हा किल्ला केवळ एक वास्तुशिल्पाचा चमत्कार नाही, तर राजस्थानची ओळख आणि धैर्याचे प्रतीकदेखील आहे.

**कला आणि श्रद्धेचा संगम**

कुंभलगड हा केवळ एक लष्करी किल्ला नव्हता. येथे ६० हून अधिक हिंदू आणि जैन मंदिरेदेखील बांधली गेली आहेत. त्यामुळे हे ठिकाण राजकीय आणि लष्करी कारवायांचे केंद्र तर होतेच, पण धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक समृद्धीचेही केंद्र आहे. किल्ल्याच्या आत बांधलेल्या मंदिरांचे कोरीव काम आणि स्थापत्य आजही धर्म, कला आणि शक्ती एकमेकांना कसे पूरक होते, हे दाखवते. विशेष म्हणजे प्रत्येक मंदिर एका विशिष्ट उद्देशाने बांधले गेले होते. काही ध्यानांसाठी, तर काही शौर्याच्या पूजेसाठी. किल्ल्याच्या वेगवेगळ्या भागांना वेगवेगळी नावे आहेत. 'दानीवा' भाग किल्ल्याच्या पूर्वेकडील बाजूस आहे, तर 'हिराबारी' ही पश्चिमेकडे जाणारी दुसरी वाट आहे. कुंभलगड किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी सात दरवाजे तयार केलेले आहेत. प्रत्येक दगड, प्रत्येक भिंत आणि प्रत्येक दरवाजा इतिहासात दडलेले काहीतरी सांगत असतो. या किल्ल्याच्या चारही बाजूंनी रात्री मशाली पेटवल्या जातात. त्यामुळे तो रात्री उजळून निघतो. हा किल्ला आणि भिंत पाहण्यासाठी अनेक पर्यटक येथे येत असतात. म्हणूनच 'युनेस्को'च्या जागतिक वारसा यादीत याचा समावेश करण्यात आला आहे.

# करा परदेशात एलएलबी



उच्च शिक्षण

मी खर्चात परदेशातून कायद्याचे शिक्षण घेण्याची इच्छा आहे का? मग ही अत्यंत चांगली संधी आहे. अनेक देशांमध्ये कायद्याचे शिक्षण अत्यंत स्वस्त दरात दिले जाते. स्वस्त असण्यासोबतच या पदवीला जगभर मान्यतादेखील असते. त्यामुळे ही पदवी घेऊन जगभरात कुठेही वकिलीचा व्यवसाय सुरू करू शकता. जर्मनी, फ्रान्स, स्पेन आणि पोर्तुगाल हे युरोपीयन देश एलएलबीसाठी कमी ट्युशन फी आणि स्वस्त राहणीमानासाठी प्रसिद्ध आहेत. या देशांमधील सरकारी विद्यापीठांमध्ये मोफत शिक्षण दिले जाते. ज्या ठिकाणी ट्युशन फी घेतली जाते. तीदेखील अत्यंत कमी असते. त्यामुळे परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी हे देश उत्तम पर्याय ठरु शकतात.

भारतमध्येही कायद्याचं शिक्षण स्वस्तात मिळते. विशेषतः लहान शहरांतील खासगी महाविद्यालयांमधील एलएलबीची फी दहा हजारांपासून ते दीड लाखांपर्यंत असते. बांग्लादेश हा भारताचा शेजारी देश असून इथे एलएलबीसाठी वार्षिक ट्यूशन फी ३० हजारांपासून सुरू होते. याच देशातील काही ठिकाणी एक लाखांपर्यंत फी घेतली जाते. इथली भाषा, राहणीमान आणि संस्कृती भारतासारखीच असल्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांसाठी इथे शिक्षण घेणे सोपे ठरते. नेपाळमध्येही एलएलबीसाठी ४० हजारांपासून ते एक लाख २० हजारांपर्यंत फी आहे. दोन्ही देश भारताचे शेजारी देश आहेत. त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांसाठी अधिक अनुकूल मानले जातात.

रशिया आणि तुर्कस्तानमध्येही एलएलबी शिक्षण कमी खर्चात करता येऊ शकते. मात्र या देशांमध्ये राहण्याचा किंवा इतर खर्च जीवनावश्यक खर्च जास्त आहेत. त्यामुळे इतर दोन देशांच्या तुलनेत रशिया आणि तुर्कस्तानमध्ये शिक्षणाचा खर्च थोडा जास्त असू शकतो.

# अर्ज तरी करा



वेगळ्या वाटा

सध्या प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढतो आहे. त्यामुळे सातत्याने नव्या संधी, नव्या नोकऱ्या निर्माण होत आहेत. मात्र विद्यार्थी अशा नोकऱ्यांसाठी तयार नसतात. आपल्याकडे पुरेशी कौशल्यं नाहीत असं त्यांना वाटतं. या कारणामुळे ते अर्जही करत नाहीत. मात्र एखाद्या नोकरीसाठी शैक्षणिकदृष्ट्या पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांनीही अर्ज करायला हवेत.

सध्या कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या पदांची निर्मिती होते आहे. आधी अशी पदं अस्तित्त्वात नव्हती. बदलतं तंत्रज्ञान, सोशल मीडियाचा वाढता वापर यामुळे सगळं गणित बदलून गेलं आहे. त्यातच कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही देतात. त्यामुळे घाबरून जायचं काहीच कारण नाही. सध्याच्या काळात अनेक नव्या संधी उपलब्ध होत आहेत. आपण प्रत्येक क्षेत्रातले तज्ज्ञ असू शकत नाही. मात्र प्रशिक्षण घेतल्यानंतर आपण कौशल्यं विकसित करू शकतो. त्यामुळे अशा संधी साधायला काहीच हरकत नाही. किमान अर्ज तर नक्कीच करायलाच हवा.

नोकरीच्या बाजारपेठेवर नजर टाकली तर ८४ टक्के कंपन्या नव्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतात. त्यामुळे आपल्याकडे कौशल्यं नसतील तरी ती आत्मसात करता येतात. जवळपास ४२ टक्के अर्जदारांकडे नोकरीशी संबंधित कौशल्यं नसतात असं एक अहवाल सांगतो. त्यामुळे तरुणांनी नोकरीसाठी अर्ज करून किमान मुलाखत द्यावी असं तज्ज्ञ सांगतात.

# विमानात कोणते कपडे घालाल ?



फॅशन पॅशन

आपण नेहमीच फॅशनच्या किंवा आरामाच्या नावाखाली शॉर्ट्स् किंवा क्रॉप कपडे घालून बाहेर पडतो. मुली क्रॉप टॉप आणि शॉर्ट्स् घालून बाहेर पडतात आणि मुलेही शॉर्ट्स् किंवा कॅप्रीज घालून बाहेर पडतात; पण लांबच्या प्रवासात याच गोष्टी त्रासदायक ठरतात. कारण ३८ हजार फूट उंचीवर उडणाऱ्या विमानात एसी एक मिनिटही थांबू शकत नाही. अशा परिस्थितीत, एकतर व्यक्तीकडे स्वतःचे ब्लँकेट किंवा शाल असावी किंवा थंडीपासून संरक्षण करू शकतील असे कपडे असावेत. छोट्या कपड्यांमुळे प्रवासभर कुडकुडत राहावे लागू शकते.

**फ्लिप फ्लॉप्स**

फ्लिप फ्लॉप फुटवेअर आरामदायी असले, तरी अशा चपलांचा इमर्जन्सी गेटकडे जाण्यासाठी अजिबात उपयोग नाही. त्यामुळे धावताना पडू शकता आणि दिसायलादेखील अशा चपला विमानतळावर अजिबात चांगल्या दिसत नाहीत.

**पॉलिस्टर आणि सिंथेटिक कपडे**


असे कपडे कितीही चमकदार आणि ब्रँडेड दिसत असले, तरी त्यांचे कापड अजिबात योग्य नसते. फ्लाइटमध्ये एसीच्या तापमानात चढ-उतार होतो. त्यामुळे मध्येच एसी काम करत नसेल तर अशा कपड्यांमध्ये अस्वस्थ वाटू शकते. विमानाला टेकऑफ करण्यासाठी थोडा वेळ लागतो. अशा परिस्थितीत उकाड्यात बसू शकत नाही. म्हणून ब्रिदेबल म्हणजेच सुती कपडे घालणे चांगले ठरते.

आगीपासून कोणीही वाचू शकत नाही. विमान प्रवासात घट्ट कपडे घालण्याचा प्रयत्न करू नका. कारण कधी कुठेही आगीसारखी परिस्थिती उद्भवली तर सिंथेटिक कापड लवकर आग पकडतात आणि त्यात लवकर अडकू शकता. असे होऊ नये असे वाटत असेल तर असे कापड घाला, जे तुमचे आगीपासून संरक्षण करू शकतील.

**स्ट्रेचेबल किंवा ॲडजस्टेबल कपडे**

विमानात प्रवास करताना, असे कपडे घालावेत जे स्ट्रेचेबल आणि ॲडजस्टेबल असतील. कारण विमान टेकऑफ करते, तेव्हा अनेकांना पोट फुगणे, डोके जड होणे किंवा उलट्या झाल्यासारखे वाटणे या समस्या जाणवू शकतात. त्यामुळेच तुम्ही हवे तसे ॲडजस्ट करता येतील किंवा सैल असतील असे कपडे घालणे चांगले ठरते. गरज पडल्यास ते काढता येतील.

# टाळा या चुका



फिटनेस फंडा

'वॉर्म अप' आणि 'कूल डाउन' ही व्यायामाची महत्त्वाची अंग आहेत. वॉर्म अपमुळे शरीर व्यायामासाठी सज्ज होतं. यामुळे दुखापती टाळता येतात. कूल डाउनमुळे हृदयाचे ठोके आणि श्वास पूर्वपदावर यायला मदत होते. पण अनेक जण फक्त मुख्य व्यायामावर भर देतात. वॉर्म अप आणि कूल डाउन किती महत्त्वाचं आहे हे अनेकांच्या गावीही नसतं. आपल्या काही चुकांमुळे व्यायामाचे सगळे लाभ मिळत नाहीत. व्यायामादरम्यान होणाऱ्या काही चुकांविषयी...

* धावपळीच्या दिनक्रमात वॉर्म अप टाळलं जातं. मात्र वॉर्म अपमुळे हृदयगती वाढते. स्नायूंना ऑक्सिजनयुक्त रक्ताचा पुरवठा होतो. शरीराचं तापमान वाढतं. वॉर्म अपमुळे शरीर व्यायामासाठी सज्ज होतं.

* काही जण झटपट वॉर्म अप उरकतात. दोन मिनिटं वॉर्म अप केलं की झालं, असं काहींना वाटतं. ही खूप मोठी चूक आहे. व्यायाम करण्याआधी ५ ते १० मिनिटं वॉर्म अप करावं.

* प्रत्येक व्यायामप्रकाराआधी वेगळं वॉर्म अप करावं लागतं. मात्र आपण एकाच पद्धतीने वॉर्म अप करत रहातो. यामुळे व्यायामाचं तंत्र बिघडतं.

* व्यायामानंतर कूल डाउन केलं नाही तर स्नायूंना त्रास होऊ शकतो. कूल डाउननंतर व्यायामामुळे झालेली शरीराची झीज भरून निघते.

* व्यायामानंतर शरीर ताणायला हवं. व्यायामादरम्यान स्नायूंमध्ये लॅक्टिक ॲसिड साचतं. यामुळे स्नायूंमध्ये वेदना जाणवतात. शरीर ताणल्यामुळे हा त्रास कमी होऊ शकतो. अर्थात स्ट्रेचिंगचं हे सत्र वेदनादायी नसावं. स्ट्रेचिंगमुळे त्रास होत असेल तर तज्ज्ञांची मदत घ्यावी.

* वॉर्म अपची सुरुवात धीम्या गतीने करावी. हे व्यायाम सौम्य असावेत. व्यायामाची गती हळूहळू वाढवायला हवी. अचानक तीव्र व्यायाम केला तर स्नायूंवर ताण येऊन टिश्यू फाटू शकतात.

* व्यायाम अचानक थांबवू नये. वॉर्म अपप्रमाणे कूल डाउनही धीम्या गतीने करावं. तुम्ही धावण्याचा व्यायाम करत असाल तर कूल डाउनसाठी आधी जॉगिंग करावं. मग ब्रिस्क वॉकिंगकडे वळावं आणि शेवटी हळू चालावं आणि थांबावं.

# प्रभाग रचनामध्ये कोणताही राजकीय हस्तक्षेप करू नये

## खासदार निलेश लंके यांची मागणी : महानगरपालिका निवडणुकीच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना महाविकास आघाडीच्या वतीने निवेदन



प्रभाग रचनामध्ये कोणताही राजकीय हस्तक्षेप करू नये याबाबत महापालिका निवडणुकीच्या संदर्भात जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करताना खा. निलेश लंके आदी.

नगर – महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने १० जून २०२५ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, ड वर्ग महानगरपालिकांमध्ये चार सदस्यीय प्रभाग प्रणाली लागू करण्यात आली आहे. सदर आदेश महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५ अन्वये राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने जारी करण्यात आला असून, त्यानुसार प्रभाग रचना करताना २०११ च्या जनगणनेचा, भौगोलिक सलगतेचा व लोकसंख्येतील समतोल यांचा अवश्य विचार करावा अशी मागणी महाविकास आघाडीच्या वतीने खासदार निलेश लंके यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी माजी महापौर अभिषेक कळमकर, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव, युवा सेनेचे राज्य सहसचिव विक्रम राठोड, नगरसेवक योगीराज गाडे, माजी महापौर दीप चव्हाण, नलिनी गायकवाड आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, याच अनुषंगाने नागरिकांमध्ये, २०१८ साली तत्कालीन नगर महानगरपालिकेसाठी करण्यात आलेली प्रभाग रचना न्याय्य व कायदेशीर असल्यामुळे तीच रचना पुन्हा कायम ठेवण्याची मागणी जोर धरू लागली आहे. २०१८ मध्येही ही रचना शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पारदर्शक आणि तांत्रिकदृष्ट्या सुसंगत पद्धतीने करण्यात आली होती. सरासरी लोकसंख्येतील १०% चा मर्यादित फरक राखण्यात आला होता तसेच कोणत्याही प्रगणक गटाची फोड करण्यात आली नव्हती. नागरिकांचा ठाम आग्रह आहे की, नव्याने प्रभाग रचना करताना कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ नये. प्रभाग रचना ही पक्षपातीपणाऐवजी पारदर्शक, कायदेशीर व निःपक्षपाती पद्धतीने व्हावी, अशी जनतेची स्पष्ट भूमिका आहे. शासनाच्या आदेशातदेखील हीच भूमिका अधोरेखित करण्यात आली असून, त्या निर्देशांचे तंतोतंत पालन न केल्यास निवडणूक प्रक्रिया अडचणीत येऊ शकते व संबंधित प्रशासनावर शिस्तभंगात्मक कारवाईची शक्यता देखील निर्माण होऊ शकते. व विशेष म्हणजे, २०१८ मध्ये केलेली रचना आजही भौगोलिक, सामाजिक आणि लोकसंख्या समतोलाच्या निकषांवर परिपूर्ण आहे. त्यामुळे, त्याच रचनेत बदल करण्याची गरज नसून, कोणतेही पक्षपाती फेरबदल केल्यास ते कायद्याच्या चौकटीत बसणार नाहीत, असा इशाराही नागरिकांकडून दिला जात आहे. संपूर्ण प्रभाग रचना प्रक्रिया ही राज्य शासन व निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसारच पार पाडली जावी, अशी लोकशाहीविषयक अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# गांजा विकणाऱ्यांवर कारवाई करायला गेले अन् काडतुसासह गावठी कट्टा सापडला

## तपोवन रोडवर दोघांना पकडले

नगर – राज्यात प्रतिबंधित असलेला गांजा विक्री करणाऱ्यांवर कारवाई करायला गेलेल्या पोलिसांना दोघा तरुणांकडे गांजा सह गावठी कट्टा आणि दोन जिवंत काडतूसे ही आढळून आली आहेत. तोफखाना पोलिसांनी त्या दोघांना पकडत त्यांच्याकडून गांजा व गावठी कट्टा, काडतुसे असा ८३ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई सावेडी उपनगरातील तपोवन रोडवरील हिन्दुत्व चौक येथे १४ जुलै रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

याबाबतची माहिती अशी तपोवन रोडवरील हिंदुत्व चौक येथे दोन इसम गांजा विकण्याच्या उद्देशाने थांबलेले आहेत अशी माहिती तोफखाना पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांचे पथक तात्काळ त्या ठिकाणी गेले. तेथे सद्गुरू टॉवर नावाच्या इमारती जवळ असलेल्या मोकळ्या प्लॉट मध्ये दोन इसम संशयितरित्या हालचाल करताना दिसले. पोलिसांनी त्यांना त्यांची नावे विचारली असता त्यांनी त्यांची नावे रविंद्र टटिया बारेला (वय २०, रा. वरळीपुरा, कोट किराडी, ता. सेंदवा, जि. बरवाडी, मध्यप्रदेश), सचिन नानुराम ब्राम्हणे (वय २०, रा. कोटा किराडी, ता. सेंदवा, जि. बडवानी, मध्यप्रदेश) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे ५२ हजार ५०० रुपये किंमतीचा ३ किलो ६६० ग्रॅम गांजा, ३० हजार रुपये किंमतीचा गावठी कट्टा व १ हजार रुपये किमतीचे २ जिवंत काडतुसे, असा एकूण ८३ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आल्याने तो जप्त करण्यात आला.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध एनडीपीएस कायदा कलम ८ (क), २० (ब) तसेच भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी, पोलीस अंमलदार सुनील चव्हाण, नितीन उगलमुगले, योगेश चव्हाण, अब्दुल इनामदार, भानुदास खेडकर, सुधीर खाडे, सुरज वाबळे, सुमित गवळी आदींनी केली आहे.

# अमरधामजवळील 'सीना'वरील पुलाच्या कामाला गती देवून लवकर पूर्ण करावे



सुनीता कुरापाटी

नगर – गेले वर्षभरापेक्षा अधिक काळापासुन सुरू केलेले नालेगाव भागातील अमरधाम जवळील सीना नदीवरील पुलाचे बांधकाम अद्याप पुर्ण झालेले नाही. त्यामुळे हा रस्ता पावसाळ्यात अत्यंत गैरसोयीचे व धोकादायक झालेला आहे. या कामाला अधीक गती देवून हे पुल लवकर पुर्ण करुन देण्याची मागणी पद्मशाली समाजाच्या महिला कार्यकर्त्या व भावनाऋषी सोसायटीतील रहिवाशी असलेल्या सौ. सुनिता कुरापाटी यांनी केली आहे.

कल्याण ते विशाखापट्टनम असलेला राष्ट्रीय महामार्ग असुन या रस्त्याची आजची अवस्था आणि चाललेल्या कामाकडे पाहिल्यास एखाद्या ग्रामिण भागातील रस्त्याच्या चाललेल्या कामाची आठवण होते. शहरातील नागरीकांच्या दृष्टीने विचार केल्यास आज नदी पलीकडे आदर्शनगर, माधवनगर, श्रीकृष्णनगर, गणेशनगर सह भावनाऋषी, बालाजी सोसायटी असुन तेथे मोठ्या संख्येने लोक राहत आहेत. तसेच रेल्वे पुलाच्या पुढे पुणे–शिर्डी मनमाडकडे जाण्यासाठी बायपास रोड असुन तेथे बायपासला कांदा मार्केट आहे. तसेच अनेक नगरवासीय पुणेकडे जाताना नगर–कल्याण रस्त्याने बायपास रोड मार्गे भुषणनगर मार्गे केडगाव रस्त्याने पुण्याला जातात. तसेच नगर ते कल्याण रोड पुढे माळशेज घाट मार्गे मुंबईला जाण्यासाठी याच मार्गाचा अनेक चारचाकी व एस टी गाड्या वापर करतात. तसेच सदरचा रस्ता हा रहदारीसाठी सतत चालु असतो.

सीना नदीकडे अनेक मोलमजुरी व गरीब वर्गाची वस्ती मोठी आहे. या सर्व कारणामुळे अमरधाम जवळील सीनानदी वरील पुलाला अधिक महत्व प्राप्त झालेले आहे. हे सौ. कुरापाटी यांनी निदर्शनास आणुन देवुन हा पुल तातडीने पुर्ण करुन देण्याची मागणी केली.

सन १९८५–८६ साली स्थापन झालेल्या या गृहनिर्माण संस्थेतील जुने व वयोवृध्द नागरीक आजही सांगतात की, या नदीवर पुल होण्यासाठी अनेकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी केलेली आहे. तसेच वृत्तपत्रामध्ये देखील मागणीच्या बातम्या देवुन लक्ष वेधलेले आहे. या गोष्टींना चाळीस वर्ष होऊनही शासन अद्याप पुल बांधुन पुर्ण केलेले नाही हे दुर्देवी आहे. केंद्रीय रस्ते विकास महामार्ग मंत्री असलेले नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच स्थानीक आमदार संग्राम जगताप यांनी विशेष लक्ष देवुन या दिवाळी पर्यंत हे पुल पुर्ण करावे अशी मागणी सौ. सुनिता कुरापाटी यांनी एका पत्रकात प्रसिध्द करुन केलेली आहे.



योनेक्स सनराईज जी.एच. रायसोनी मेमोरियल जिल्हा बॅडमिंटन व जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेचे बक्षिस वितरण पार पडले.

# गुणी खेळाडू घडण्यासाठी बॅडमिंटन असोसिएशनला सर्वतोपरी सहकार्य करणार

## राजेंद्र चोपडा यांचे प्रतिपादन; जिल्हा बॅडमिंटन निवड चाचणी व जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा २०२५ उत्साहात

नगर – नगरमध्ये अतिशय गुणी खेळाडू असून त्यांना स्पर्धेतून गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळते. जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन अतिशय चांगले नियोजन करून स्पर्धा घेत असते. येणाऱ्या काळात अशा एका स्पर्धेचे प्रायोजकत्व घेण्याची घोषणा उद्योगपती राजेंद्र चोपडा यांनी केली.

योनेक्स सनराईज जी.एच. रायसोनी मेमोरियल जिल्हा बॅडमिंटन व जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा वाडिया पार्क बॅडमिंटन हॉल येथे उत्साहात पार पडल्या. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत विविध गटातून १७० खेळाडूंनी सहभाग घेतला. नगरची राष्ट्रीय खेळाडू कु. विधी सैनी हिने चार गटांत तर श्रीशैल भागानगरे याने तीन गटात विजेतेपद पटकावले. स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास जी.एच. रायसोनी ग्रुपचे संचालक डॉ. वैभव हेंद्रे, राजेंद्र चोपडा, चेतन बोगावत यांच्यासह अहिल्यानगर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.अशोक कोठारी, सचिव तथा महाराष्ट्र बॅडमिंटन संघटनेचे सदस्य मिलिंद कुलकर्णी, ॲड. कराळे आदी उपस्थित होते.

डॉ. हेंद्रे म्हणाले की, जिल्हा स्तरावरील या स्पर्धेत खेळाडूनी आपले कौशल्य अतिशय चांगल्या पद्धतीने दाखवले. भविष्यातही अशा स्पर्धांच्या आयोजनासाठी सहकार्य केले जाईल.

नगरमध्ये कुस्ती नंतर प्रथमच बॅडमिंटन स्पर्धेत अंतिम सामन्यातील विजेते व उपविजेत्या खेळाडूंवर चेतन बोगावत, राजेंद्र चोपडा यांनी वैयक्तिक रोख स्वरूपात बक्षीसांचा वर्षाव केला. विजेत्या खेळाडूंना सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र व रोख बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतून १७ वर्षाखालील मुले व मुली, १९ वर्षाखालील मुले व मुली तसेच महिला व पुरुष संघ निवडण्यात येणार आहे. प्रेक्षकांना अतिशय उच्च दर्जाच्या खेळाची मेजवानी मिळाली.

स्पर्धेचा सविस्तर निकाल गटनिहाय विजेते व उपविजेते खेळाडू पुढीलप्रमाणे–मुली डबल्स अंडर १९ – श्रेया राठोड व विधी सैनी आणि संजना माने व तेजल कुळाल, मुले डबल्स अंडर १९ – आर्यन राठोड व राजवीर आढाव आणि नील पितळे व श्रीशैल भागानगरे, मुली सिंगल अंडर १९– विधी सैनी, किमया आहेर, मुले सिंगल अंडर १९– श्रीशैल भागानगरे, नील पितळे, मुली डबल्स अंडर १७– भूमी डागा व तनिष्का जगताप, निरजा गुगळे व साची अग्रवाल, मुले डबल्स अंडर १७– अयान बायस व नील पितळे आणि अशर शेख व राजवीर कुक्कुडवाल, मुली सिंगल अंडर १७– विधी सैनी, किमया आहेर, मुले सिंगल अंडर १७– नील पितळे, आर्यन राठोड, मुले डबल्स अंडर १५ – अशर शेख व मिथिलेश पवार आणि आर्यन पवार व विराज गाडेकर, मुली सिंगल अंडर १५– विधी सैनी, निरजा गुगळे, मुले सिंगल अंडर १५– अशर शेख, मिथिलेश पवार, मुले डबल्स अंडर १३– जीत मुथियान व शर्विल काळे आणि नमित फिरोदिया व सक्षम आगरकर, मुली सिंगल अंडर १३– सायली माने, प्रांजली यादव, मुले सिंगल अंडर १३– सक्षम आगरकर, शर्विल काळे, मुले सिंगल अंडर ११– जीत मुथियान, शर्विल काळे, पुरुष डबल्स – ऋषीकेश भोर व श्रीशैल भागानगरे आणि किरण वर्पे व मनोज जगदाळे, महिला सिंगल – श्रेया राठोड, तेजल कुळाल, पुरुष सिंगल – श्रीशैल भागानगरे, शाश्वत गणवीर.

## वरद धर्माधिकारी सीए परीक्षा उत्तीर्ण



नगर – माणिक चौकातील रहिवासी वरद धर्माधिकारी याने सीए परीक्षा उत्तीर्ण केली आहे. त्याचे शिक्षण व आर्टिकलशीप पुणे येथे झाली. येथील पुरोहित निलेश व सौ. स्नेहल धर्माधिकारी यांचा तो मुलगा तर डॉ. नेहा धर्माधिकारी यांचा धाकटा भाऊ आहे. या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# पानाच्या टपरीवर मावा तयार करण्याच्या मशिनसह सापडली तलवार

नगर – राज्यात प्रतिबंधित असलेला मावा विक्री करणाऱ्या टपरीवर नगर तालुका पोलिसांनी छापा टाकून मावा बनवण्याच्या दोन मशीनसह एक धारदार तलवार जप्त केली. ही कारवाई नगर तालुक्यातील वाळुंज गावच्या शिवारात राजवीर नावाच्या टपरीवर १४ जुलै रोजी सकाळी केली.

नगर तालुका पोलिसांना मिळालेल्या माहितीवरुन पोलिसांनी वाळुंज गावच्या शिवारातील बबलू उर्फ कालिदास गायकवाड याच्या राजवीर नावाच्या टपरीवर छापा टाकला. या कारवाईत ४० हजार रुपये किमतीचे सुपारी कट करण्याचे इलेक्ट्रिक मशीन, ३० हजार रुपये किमतीचे मावा मिक्सिंग करण्याचे इलेक्ट्रिक मशीन जप्त केले. पोलिसांनी तेथील कसून झडती घेतली असता एक धारदार तलवार मिळून आली. पोलिसांनी मावा बनवण्याच्या दोन मशीन सह एक तलवार असा ७१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सागर मिसाळ यांनी दिलेल्या यादीवरुन बबलू उर्फ कालिदास पांडुरंग गायकवाड (वय ३२, रा. वाळुंज ता. नगर) याच्याविरुद्ध बी एन एस २२३, २७२, २७४ तसेच भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# दिव्यांग मुलांच्या पालकांना कायदेशीर पालकत्व प्रमाणपत्राचे वितरण

## दिव्यांगांना समाजाच्या प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने पालकांनी प्रयत्न करावे : प्रशांत गायकवाड



दिव्यांग मुलांच्या पालकांना कायदेशीर पालकत्व प्रमाणपत्राचे वितरण करताना जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रशांत गायकवाड.

नगर – अहिल्यानगर जिल्हयातील १० दिव्यांग मतिमंद मुलांचे कायदेशिर पालकत्व प्रमाणपत्राचे वितरण जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रशांत गायकवाड यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. नॅशनल ट्रस्ट फॉर वेलफेअर ऑफ परर्सन्स विथ ऑटीझम सेरेबल पाल्सी मेंटल रिटायर्डेशन ॲण्ड मल्टीपल डिसेंबीलीटी ॲक्ट १९९९ च्या कायदयातील कलम १४ (४) मधील तरतुदी नुसार जिल्हा परिषद येथील जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय येथे हा उपक्रम राबविण्यात आला.

प्रशांत गायकवाड म्हणाले की, कायदेशीर पालकत्व प्रमाणपत्राचा उपयोग पालकांनी केंद्रशासन व राज्यशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ दिव्यांग व्यक्तींना मिळवून देण्याबाबत व दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने पालकांनी प्रयत्न करावा. दिव्यांग पाल्याचे भवितव्य उज्वल करण्याचे त्यांनी आवाहन केले.

यावेळी नंदकिशोर बळीराम शिवशरण, अनिल किसन कडलग, अश्पाक गफूरभाई शेख, संदीप एकनाथ देठे, मनिषा किशारे शिंदे, रेश्मा सोपान तारडे, शबनम शेख, शिवाजी गागरे, विदया नांगळ, तरन्नुम खान आदी दिव्यांग व्यक्तींच्या पालकांना कायदेशिर पालकत्व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

कायदेशीर पालकत्व देण्यामध्ये स्थानियस्तर समिती अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे सहकार्य लाभले. पालक अनिल कडलग सरांनी जिल्हाधिकारी दिव्यांग सक्षमीकरण कक्षा अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. दिव्यांगाप्रती असलेली तळमळ प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून जाणवल्याचे सांगितले. या कार्यक्रमास सावली दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब महापुरे, मुख्याध्यापक सचिन तरवडे, विजय बळीद, गिन्यानदेव जाधव, सुयोग निमसे, शिवानंद भांगरे आदींसह दिव्यांग मुलां–मुलींचे पालक उपस्थित होते.



सी.ए.परेश बोरा, सी.ए.राजेश सोनग्रा यांचा जैन ओसवाल पतसंस्थेतर्फे सत्कार करताना संचालक मंडळ

# सी.ए.परेश बोरा, राजेश सोनग्रा यांचा जैन ओसवाल पतसंस्थेतर्फे सत्कार

नगर – सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे तज्ज्ञ संचालक सी.ए.परेश बोरा यांची अहमदनगर महाविद्यालयातील कॉमर्स विभागाच्या विभागप्रमुखपदी नुकतीच निवड झाली आहे. तसेच पतसंस्थेचे ऑडिट व नवीन सिस्टिम मधील बदलांबाबत वेळावेळी मार्गदर्शन करणारे सी.ए.राजेश सोनग्रा यांचा गुरुपौर्णिमेनिमित्त पतसंस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. सी.ए.बोरा यांचा सत्कार ज्येष्ठ संचालक शांतीलाल गुगळे तसेच सी.ए.सोनग्रा यांचा सत्कार संचालक संतोष गांधी यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी चेअरमन समीर बोरा, व्हाईस चेअरमन अभय पितळे, संचालक मनोज गुंदेचा, संतोष गांधी, शांतीलाल गुगळे, शैलेश गांधी, चेतन भंडारी, विनित बोरा, शरद गोयल, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी आदी उपस्थित होते.

# करारप्रमाणे फर्निचरचे काम न करता केली ४.५१ लाखांची फसवणूक

## तिघा जणांवर गुन्हा दाखल

नगर – फ्लॅटचे फर्निचरचे काम घेऊन लेखी करारनाम्या प्रमाणे काम न करता निकृष्ट दर्जाचे काम करुन कराराप्रमाणे निर्धारित वेळेत काम केले नसल्या बाबत विचारणा केली असता तुमचे काम करणार नाही असे सांगून पैसे माघारी न देता तिघांनी ४ लाख ५१ हजार रुपयाची फसवणूक केली. ही घटना सावेडी परिसरातील सहकारनगर येथे घडली.

याबाबत शुभम अशोक फुंदे (वय. २६, रा. ऐक्यनगर, पाईपलाईन रोड, मूळ रा. संभाजीनगर, पाथर्डी रोड, भिंगार ) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. फिर्यादी हे त्यांच्या क्लासेसची प्रिंटिंग, लग्नपत्रिकेचे काम करीत असताना त्यांची सिमरन संजय पंजाबी (पत्ता माहित नाही) हिमांशू खत्री, अर्जुन खत्री यांची ओळख झाली होती. त्या ओळखीतून फिर्यादी यांनी त्यांच्या सहकारनगर येथे फ्लॅटचे फर्निचरचे काम ठेकेदार सिमरन पंजाबी व त्यांचे साथीदार यांना सांगितले त्याप्रमाणे त्यांनी फर्निचर काम करण्यासाठी ९ लाख ६९ हजार रुपयांचे कोटेशन सांगितले होते. त्यावेळी झालेल्या बोलण्यानंतर फिर्यादी यांनी लेखी, संपूर्ण कागदपत्रे व अटी व शर्ती प्रमाणे काम करावे लागेल. असा साध्या कागदावर लेखी करारनामा केला.

त्यानुसार २२ मे रोजी घराचे फर्निचरचे काम सुरु केले. कामाच्या दरम्यान फिर्यादी यांनी वेळोवेळी ऑनलाईन व्यवहाराद्वारे ४ लाख ५१ हजार रुपये सिमरन पंजाबी, हिमांशू खत्री व अर्जुन खत्री यांना दिले होते. काम सुरु असताना ठेकेदार यांनी ठरल्याप्रमाणे मटेरियल न वापरता कमी दर्जाचे प्लायवूड व इतर वस्तू वापरुन फर्निचर तयार केले आहे. असे फिर्यादी यांच्या निदर्शनास आले. फिर्यादी यांनी याबाबत ठेकेदार यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी तुम्ही काळजी करु नका फर्निचर तयार झाल्यावर चांगली दिसेल व त्याचा फायनल गेटअप काम पूर्ण झाल्यावर येतो. असे सांगून विश्वास दिला. तसेच तुम्ही फर्निचरचे मटेरियल चेक करुन घेऊ शकता असेही सांगितले. त्यावर फिर्यादी यांनी इंटेरियर डिझायनर व कारपेंटर असलेल्या आदित्य सोनवणे व प्रकाश सुतार यांना सांगून कामाची पाहणी केली असता त्यांनी लेखी करारनाम्या प्रमाणे काम दिसत नाही. तुमची फसवणूक झालेली आहे असे सांगितले. यावर फिर्यादी यांनी ठेकेदार यांना कामाच्या दर्जाबाबत विचारले असता त्यांनी फिर्यादी यांना उडवाउडवीची उत्तरे दिली. व कराराप्रमाणे ठरलेल्या निर्धारित वेळेमध्ये काम पूर्ण केले नाही म्हणून दिलेले ४ लाख ५१ हजार रुपये परत मागितले असता ठेकेदारांनी तुम्ही दिलेले पैसे परत देणार नाही. व तुमचे कामपण करणार नाही. असे सांगून फिर्यादी व त्यांच्या भावाला शिवीगाळ करुन दमदाटी केली व पैसे न देता तसेच वेळेत काम न करता फसवणूक केली. असे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरुन पोलिसांनी तिघांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# नगरच्या मार्केटयार्ड चौकात ११ लाखांचा गुटखा पकडला



नगरच्या मार्केटयार्ड चौकात ११ लाखांचा गुटख्याचा, पानमसाल्याचा साठा पकडल्यानंतर त्याच्या सह कोतवाली पोलिसांचे पथक.

नगर – राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा व पानमसाला विक्री करण्याच्या उद्देशाने कार मधून वाहतूक करणाऱ्या दोघांना कोतवाली पोलिसांनी पाठलाग करुन पकडले. ही कारवाई मार्केटयार्ड चौकात १४ जुलै रोजी दुपारी अडीच वाजता केली. या कारवाईत ११ लाख ७ हजार ५५० रुपयाचा गुटखा, पानमसाला व कार असा मुद्देमाल जप्त केला.

कोतवाली पोलीसांना मिळालेल्या माहितीवरुन पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या सुचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड यांच्या नेतृत्वाखाली पथकाने आंबेडकर पुतळा परिसरात सापळा रचून संशयित चारचाकी वाहन (क्र. एम एच १२ व्ही व्ही ३६१५) थांबवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी वाहन चालकाने पळण्याचा प्रयत्न केला.परंतु पोलिसांनी ती कार पकडली. कारमध्ये असलेल्या जुबेर वाहीद जौहर शेख (वय ३१, रा. कोंढवा खुर्द, पुणे) व शंकर विलास नेटके (वय २२, रा.नालेगाव, अ.नगर) या दोघांना तात्काळ ताब्यात घेऊन वाहनाची झडती घेतली असता, त्यांच्या वाहनात १ लाख २३ हजार ७५० रुपये किंमतीच्या पानमसाल्याच्या २५ गोण्या, ८ हजार ८०० रुपये किमतीच्या तंबाखूच्या २ गोण्या, ९ लाख ७५ हजार रुपये किमतीची टाटा कंपनीची कार असा सुमारे ११ लाख ७ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. पोलिसांनी मुद्देमालासह दोघांना ताब्यात घेतले.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पो. कॉ. महेश पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३, २२३, २७४, २७५ व अन्न सुरक्षा आणि मानके कायदा २००६ चे कलम २६, २७, ५९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, पोलीस अंमलदार बाळकृष्ण दौंड, विशाल दळवी, सलीम शेख, विनोद बोरगे, सूर्यकांत डाके, विजय काळे, अभय कदम, सत्यजित शिंदे आदींसह दक्षिण मोबाईल सेलचे पो.कॉ. राहुल गुंडु यांनी केली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

